# ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)
# वार्षिक वृत्त

**राष्ट्रीय शके १९३६-३७ (सन २०१४-१५)**

या वर्षीचे वृत्त तुम्हा सगळ्यांच्या हातात देताना एक वेगळेच समाधान मनात दाटून येतंय. कामाला २० वर्षे पूर्ण झाल्याचे समाधान! २० वर्षापूर्वी सुरवात केली तेव्हा महिला म्हणत होत्या, 'आम्ही घाबरत घाबरतच बचत गटांमध्ये सहभागी झालो. हे सगळे काय आहे आणि आपल्याला ते जमेल का याचाच अंदाज येत नव्हता. सुरवातीला घरच्यांपासून चोरुन बचत करणाऱ्या आमच्यातल्या काहीजणी आज वेल्हे तालुक्यातल्या मुली-बाळी सासरी नीट नांदाव्यात म्हणून दक्षता समितीच्या कामामध्ये जातीने लक्ष घालतोय तर काहीजणी देशाचा कारभार कसा चालतो हे पाहायला दिल्लीला जाऊन आलो! परतताना विमानाने आलो. सगळा खर्च आमचा आम्ही केला.'

आज परिस्थिती बदलली आहे. फक्त बचतगटच नाही तर तीन तालुक्यातील ५००० महिलांसाठी आणखी खूप वेगवेगळ्या कामांची मुहूर्तमेढ आम्ही रोवू शकलो. ते काम वाढले देखील. आमचा तालुका कुपोषणमुक्त करण्याच्या कार्यक्रमात आम्ही पुढाकार घेतला आणि तो कुपोषणमुक्त करून दाखवला! तर शेजारच्या सातारा जिल्ह्यात जाऊन तिथल्या मैत्रिणींसाठी आमच्या ५० गावच्या ५० जणींनी एका दिवसाची शिबिरे घेतली. त्यांच्याशी मैत्री केली आणि घराबाहेर पडल्यावर स्वतःमध्ये आणि कुटुंबात गावात कसा बदल होतो हे अनुभवले. हा स्त्री शक्ती प्रबोधनाचा महत्त्वाचा टप्पा!

आज कामाला २० वर्षे झाल्याचे निमित्त करून आम्ही तुम्हाला मनातल्या बऱ्याच गोष्टी सांगणार आहोत. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आता महिला एकेकट्या राहिलेल्या नाहीत. स्थानिक पुढारपण करणाऱ्या सगळ्यांनी मिळून एक संस्था स्थापन केली. '**जिजामाता प्रबोधन केंद्र**' या नावाने आता नोंदणीकृत संस्था झालोय. मावळासकट सर्व गुंजवणी-कानंदी-वेळवंडी आणि शिवगंगेच्या खोऱ्यातल्या १२५ जणी या संस्थेच्या सभासद आहेत. ९ जणी संस्थेच्या कार्यकारी अधिकारीही आहेत. आज वीस वर्षांनंतर या ग्रामीण महिलेच्या मुली, सुना, नातवंडे सगळ्यांसाठीच काम करायचे बळ तिला मिळाले आहे. हा आमच्या एकीचा आणि सातत्याने केलेल्या कामाचा परिणाम! वाढलेल्या कामाचा अहवाल तुमच्यासमोर ठेवत आहोत.

## अनुक्रमणिका


➢ शब्द ते शक्ती प्रकल्प
- किशोरी विकास
- युवती विकास
- हिरकणी विकास
- महिला (३० ते ६० )

**व्यक्तिमत्त्व विकसन**

* बचतगट * हिशोब मेळावे * नाबार्ड प्रकल्प
* चाकोरीतून बाहेर पडण्यासाठी सहलींचा अनुभव

**स्वयंरोजगार प्रशिक्षण व उद्योजकता**

* उद्योजकता सहल
* ग्रामीण जीवन परिचय सहली
* नवे उद्योग, उद्योजकता मेळावा

**महिला आरोग्य**

* गरोदर महिलांची मासिक तपासणी
* रक्त तपासणी शिबिर, डोळे तपासणी शिबिर
* कॅन्सर विषयक जाणीव जागृती व तपासणी

**महिला नेतृत्व**

* नवरात्र व संक्रांत मेळावा * दक्षता समिती
* महिला ग्रामसभा आयोजनामध्ये

स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसोबत काम

➢ विविध प्रकल्प

बालवाडी प्रकल्प
राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन
ऊर्जा आरोग्य प्रकल्प
प्रवास आत्मविश्वासाचा
नसरापूर संवादिनी

➢ परदेशी विद्यार्थ्यांसोबत काम

➢ कामाची दखल

हैद्राबादः निबंध वाचन
श्रुतीताई फाटक यांची भेट
मेगन मॉर्गनची भेट
पुरस्कार

➢ बैठकींद्वारे नियोजन व निवेदन

सुकाणू बैठक

➢ विविध लेख

चाकोरीतून बाहेर पडताना- सुवर्णा गोखले
आमचेही तंबू शिबिर- आशा सुर्वे
द्विदशकपूर्ती मेळावा- सुवर्णा गोखले


*****

# शब्द ते शक्ती प्रकल्प

शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यातील साधारणतः ५० गावांमधून चाललेले महिला प्रबोधनाचे आपले काम हे मुख्यतः **'शब्द ते शक्ती'** या प्रकल्पाच्या माध्यमातून होत आहे. किशोरवयीन मुलगी ते आरोग्य प्रकल्पांमध्ये सहभागी होणारी वृद्धा अशा सर्व वयोगटांसाठीचे म्हणजेच किशोरी, युवती, हिरकणी व महिला या सर्व वयोगटातील ग्रामीण महिलेसाठी ४ प्रकारांचे काम मुख्यतः या प्रकल्पाद्वारे होते.

परिस्थितीमुळे आणि समाजातील सर्वात शेवटच्या 'बाईपणाच्या' पायरीवर उभ्या असल्याने ज्यांच्या मुखातून शब्दही फुटत नाही, स्वतःच्या अडचणींबद्दल ज्या अवाक्षरही बोलत नाहीत, अशा महिलांना त्यांच्यातील कर्तृत्वाची आणि संघटनाची शक्ती जाणवावी, अनुभवावी आणि ती व्यक्त व्हावी यासाठी **'शब्द ते शक्ती'** हा प्रकल्प प्रपंच!

या प्रकल्पांमधून ४५० किशोरी, २०० युवती व ५००० महिलांपर्यंत पोहोचत असलेल्या कामाचा अहवाल पुढे देत आहोत.

## ■ किशोरी विकास

२०१३-१४ वर्षी पासून किशोरी विकासच्या नित्य तासिकांच्या जोडीला काही विशेष उपक्रम घ्यावेत असे ठरवले. यात गणेशोत्सवातील मुलींचा सहभाग आणि सायकल फेरी यांचा समावेश होता. या उपक्रमांमधून एकूण विद्यार्थिनींपैकी ६६% विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. नित्य उपक्रमात १० शाळांमधील २८२ मुली सहभागी आहेत.

**नित्य तासिकाः** १० शाळांमध्ये मिळून दरमहा एक अशा ८ तासिका कौशल्याच्या आणि ८ तासिका आशयाच्या झाल्या. तसेच २ शिबिरांमधून मुली निवासी होत्या. साधारणपणे २० तासिकांइतका वेळ त्या आपल्या संपर्कात होत्या.



**शिबिरेः** शिबिरामध्ये कागदी घडीपासून ओरिगामी वस्तू करायला शिकवल्या. तंबू शिबिरात गटशः पथनाट्ये बसवली. ३३ गावांमधील १५० मुलींनी ८ विषय घेतले. त्यांचा सराव व सादरीकरण खोपी गावातील गावकऱ्यांसमोर झाले. अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षण, हुंडाबळी, ग्रामस्वच्छता असे गावकऱ्यांच्या रोजच्या जीवनातील महत्त्वाचे विषय या पथनाट्यांमधून सर्वांसमोर आले.

**कथाकथन स्पर्धाः** गेल्या ४ वर्षांपासून मुलींमध्ये वक्तृत्वकला जोपासलीजावी यासाठी कथाकथन स्पर्धांचे आयोजन केले जाते. यावर्षी ११ शाळांमधून ५० मुली सहभागी झाल्या. 'बोधपर कथा' असा विशेष विषय दिला होता. त्यासाठी तासिकांमधून मार्गदर्शन केले. कथामालेच्या विद्याताई रानडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुलींची तयारी करून घेतली. यावर्षी यामुळे स्पर्धेच्या दर्जात सुधारणा जाणवली.स्पर्धेसाठी प्रमुख पाहुण्या म्हणून "संपूर्ण बांबू केंद्र' या संस्थेच्या डॉ. निरुपमाताई देशपांडे उपस्थित होत्या. प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते मा. माधवराव देशपांडे यांनी मुलींना ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. आप्पासाहेब पेंडसे यांच्या आठवणी सांगितल्या. एकूण ६ विद्यार्थिनींना बक्षिसे मिळाली तसेच कथामालेचे प्रमाणपत्रही मिळाले. सर्व शाळेतील शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सहभागही होता.



**गावपातळीवरील मेळावेः** या वर्षी ७ गावांमध्ये एकूण ५० मुलींसाठी एका दिवसाचे मेळावे घेण्यात आले. ६ जणींनी हे मेळावे घेतले.

**तंबूशिबिरः** २७ ते २९ डिसेंबर २०१४ मध्ये खोपी गावाच्या माळावर १५६ मुलींचे तंबूतले राहते शिबिर झाले. सुलभाताई मराठे यांनी प्रसंगनाट्य सादरीकरण कसे करावे यावर सप्रयोग सत्र घेतले. गावात मुलींनी सराव व सादरीकरण केले. यात मुलींनी व्यसनमुक्ती, शाळा, मुलींकडे पाहण्याचा गावातील लोकांचा आणि जगाचा दृष्टिकोन, स्त्रीभ्रूणहत्या, आरोग्य असे विषय निवडले होते. नाट्य सादरीकरणाबरोबरच विविध खेळ आणि व्यायाम झाले. प्रबोधिनीच्या हराळी केंद्राचे प्रमुख मा. आण्णा ताम्हनकर ह्यांनीही शिबिरास भेट दिली.आपल्या भागातील कामात तिसरी पिढी भविष्याची आव्हाने पेलण्याचा निश्चय करीत आहे हे पाहून त्यांना समाधान वाटले.



**आमच्या मुलींची सोय आम्ही नाही तर कुणी करायची ?**

तंबू शिबिरासाठी गेल्यावर्षी ९० मुली आल्या होत्या. या वर्षी १००–१२० मुलींच्या शिबिराची तयारी करू, असे ठरवले. हे शिबिर सायकल फेरी नंतर लगेच असल्याने,शिक्षकांच्या सहकार्यामुळे यावेळच्या तंबू शिबिराला प्रचंड प्रतिसाद मिळाला. शिबिर सुरू झाले तेव्हा १५६ मुली हजर होत्या! एकदम एवढी संख्या वाढली तरी बचतगटातल्या बायकांनी पुढाकार घेऊन आयत्यावेळी सर्वांना पोटभर खाऊ घातले.

**विद्याव्रतः** व्यक्तिमत्त्व विकसनासाठी विद्याव्रत हा संस्कार दरवर्षी किशोरी विकासमधील मुलींसाठी होतो. प्रबोधिनीच्या सर्वच उपक्रमांमधून विविध वयोगटातील मुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकसन, कौशल्य विकसन, वृत्ती घडण आणि प्रेरणा जागरण यावर जाणीवपूर्वक काम चालू असते. विद्याव्रत हे किशोर वयात घेतले जाणारे व्रत आयुष्यभर पाळण्यासाठी करण्याचे असे असते. यातून मुलींच्या वृत्ती घडणीसाठी त्यांनी स्वतःहून काही नियम स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी पाळायचे असतात.

यावर्षी हे विद्याव्रत अधिक जाणतेपणाने व्हावे म्हणून काही पुस्तके मुलींना वाचायला दिली होती. त्यात विविध चरित्रे, 'जिद्दीची लोभस रूपे', 'हट्टी व्हा हट्टी', 'गाता गीताई' अशी पुस्तके होती. त्याचा उपयोग मुलींनी केला.

विद्याव्रतींसाठी काही व्याखानांची किंवा अनुभवांची रचना केलेली असते. ही व्याख्याने शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकसनावरील असतात. उपासनेचे महत्त्व, निग्रह शक्तीचे व्यक्तिमत्त्व विकसनातील महत्त्व यावर त्यांच्याशी बोलले जाते. ही विद्याव्रताची व्याख्यानेही ग्रामीण भागात काम करणाऱ्या स्थानिक कार्यकर्त्यांनी द्यावीत अशी जोड देण्याचा प्रयत्न यावर्षी केला गेला. यासाठी ७ कार्यकर्त्यांचे प्रशिक्षणही झाले. त्यातील ३ कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष व्याख्याने दिली. कल्याण आणि कुसगाव येथील शाळेमधील १३० विद्यार्थ्यांचे विद्याव्रत झाले. विद्याव्रताच्या पूर्वतयारीसाठी किशोरी विकासच्या माजी विद्यार्थिनींनी पुढाकार घेतला.

**गावपातळीवरील दलेः** शिवापूर व वेल्हे येथे गावपातळीवर दल घेणाऱ्या २० युवतींचे प्रशिक्षण झाले. ५ महिने आठवड्यातील २ दिवस असे होते. यात छात्रप्रबोधनच्या अंकाचे वाचन, खेळ, व्यायाम व पद्य यांचा समावेश होता.

वेल्हे,कोंढवली,कांजळे,कुसगाव, खोपी,कल्याण, दिघेआळी येथे दले झाली. गावपातळीवरील किशोरी त्या निमित्ताने संध्याकाळी खेळ आणि विविध कौशल्य प्रशिक्षणांसाठी एकत्र आल्या.

**ग्रंथालयाची जोडः–** किशोरी विकास उपक्रमामध्ये मुलींमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून ग्रंथालयांची जोड या वर्षीपासून दिली आहे. यासाठी खोपी गावातील गीतमंगलताई भडाळे काम करतात. त्यांनी एम् . लिब् . चे शिक्षण पूर्ण केलेले आहे. गावागावातील प्रबोधिकांच्या मदतीने सध्या ८ ठिकाणी ग्रंथालय सुरू केले आहे. कोदवडी, आंबवणे,पाल,वाजेघर, भट्टी, विहीर, खोपी, वाघदर या गावांमधील मुली आणि महिला त्याचा लाभ घेत आहेत. वाचकांच्या वाचनाचा मागोवा घेण्याचे काम हळूहळू सुधारत आहे.

**स्कॉलरशिपः** परिस्थितीमुळे ज्यांचे शिक्षण अडले आहे अशा मुलींना शिष्यवृत्ती देण्याचे काम आपण गेल्या ३ वर्षांपासून करीत आहोत. मा. विजयाताई रसाळ या आपल्या ज्येष्ठ कार्यकर्त्या यासाठी निधी संकलन करीत आहेत. पुण्यातील सुहृदांकडून त्यांनी ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाकरिता निधी जमा केला.

**वेल्हे सहनिवासः** वेल्हे तालुक्यातील मावळ भागामधील दुर्गम गावांमध्ये मुलींना सातवीनंतर शाळेत जाण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी एका वेळी ८ कि. मी. प्रवास करून शाळेत यावे लागते. यामुळे बऱ्याच मुलींची शाळा सातवीनंतर सुटते. चालत जाण्या–येण्याच्या कष्टामुळे ज्यांची शाळा सुटते, अशा मुलींसाठी वेल्हे येथेच जर त्यांची निवासाची व्यवस्था झाली, तर त्यांचे शिक्षण चालू राहू शकते असे जाणवते. १७ गावांमधील पुढील शिक्षण चालू ठेवण्याची इच्छा असणाऱ्या अशा ३५ मुलींचे ३ दिवसांचे निवासी शिबिर वेल्हे येथे घेतले. त्यातून ७ मुली सहनिवासात राहायला आल्या.

सहनिवासातील मुलींच्या दैनंदिन जीवनातील मदतीसाठी बोरावळे गावाच्या कुंदाताई खंडाळकर, व त्यांच्या अभ्यासातील प्रगतीसाठी रंजिताताई सरवदे दोघी पूर्णवेळ त्यांच्यासोबत वेल्हे येथे राहात आहेत. प्रबोधिका शैलाताई भोंडेकर आणि द्वारकाताई वालगुडे या त्यांच्या सर्व अडचणी सोडविण्यासाठी त्यांच्या पाठीशी उभ्या असतात.

## ■ युवती विकास

**जास्वंद वर्ग वेल्हा १० वी तुकडी–** युवतींसाठी कौशल्य प्रशिक्षणाचे काम 'जास्वंद वर्ग' या संकल्पनेद्वारे मागील ८ वर्षांपासून चालू आहे. वेल्हे येथे जवळपासच्या ५–६ गावातील ३० युवतींनी जास्वंद वर्गास प्रवेश घेतला. या वर्गामध्ये भरतकाम, विणकाम, क्रोशाचे काम आणि ओरिगामी कलेचे वर्ग झाले. शिवणाचे प्राथमिक शिक्षणही त्यांना देण्यात आले.

मुलींना गावपातळीवरील कामाच्या संयोजनाचा सराव व्हावा यासाठी त्यांनी विविध गावांमध्ये जाऊन गावपातळीवर शिबिर आयोजित करण्याचा अनुभव योजला होता. वर्गातील प्रशिक्षणाचा भाग म्हणून युवती गटातील मुलींनी पासली व गुंजवणी खोऱ्यातील २०गावांमध्ये गावपातळीवरील शिबिरे घेण्याचा अनुभव घेतला.



मुलींची दृष्टी विस्तारावी म्हणून या मुलींची कोल्हापूर येथे सहल आयोजित केली होती. तेथे त्यांनी कांचनताई परुळेकर यांची भेट घेतली. स्वयंसिद्धा संस्थेत त्यांनी स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण घेतले. कोल्हापुरातील शेतकरी मॉलला त्यांनी भेट दिली. अशा प्रकारच्या मॉलमध्ये त्या प्रथमच गेल्या होत्या.

**जास्वंद वर्ग आंबवणे : तुकडी ११वी –**आंबवणे केंद्रामध्ये २० युवतींचा ४ महिन्यांचा तर १४ युवतींचा २ महिन्यांचा वर्ग झाला. या वर्गातही वेल्ह्याप्रमाणे शिवण,हस्तकला, आरोग्य आणि नेतृत्व विकसन हे महत्त्वाचे विषय होते.

**ब्युटी पार्लर वर्ग:–** नसरापूर येथे ८ जणींचा ब्युटी पार्लर वर्ग पूर्ण झाला. सांगवीच्या दिपालीताईंनी प्रशिक्षण दिले.

**माजी किशोरी व युवती मेळावा:** शिवापूर येथे कल्याण व कुसगावातील १६ युवतींचा तर आंबवणे येथे ६ गावांमधील ३६ युवतींचा मेळावा झाला. कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट मधील मार्गदर्शक या मेळाव्यास उपस्थित होते. विविध व्यावसायिक प्रशिक्षणांद्वारे युवतींना असणारी व्यवसायाची संधी याबद्दल त्यांनी सांगितले.
३५ गावांमधील १०० युवतींनी याचा लाभ घेतला.

## ■ हिरकणी विकास

हिरकणी या नवमातांच्या गटाची २०१४–१५ मध्ये कामात भर पडली. या उपक्रमामुळे गावात येणाऱ्या सुनांची ओळख झाली. सन २०१३ पासून ० ते ६ वयोगटातील मुलांच्या आईसाठी आपण पूरक प्रशिक्षण वर्ग चालू केले. याचा हेतू असा होता की या वयोगटातील बालकांच्या आईला प्रशिक्षण दिल्यास मुलांच्या सर्वांगीण वाढीसाठी लागणारे पूरक वातावरण घरी तयार होईल.

शिवापूर, कुसगाववस्ती, गाऊडदरा, कोदवडी,बोरावळे, भट्टी आणि कुसगाव अशा गावांमधून सत्रे झाली. दरमहा दोन घड्याळीतासांचे एक सत्र अशी सुरूवात झाली.

सत्रांच्या आशयात मुलांचे आरोग्य, इंद्रिय विकास, बुद्धिविकासाच्या संकल्पना पालकांना स्पष्ट केल्या. त्यासाठी वेगवेगळे खेळ व कृती सत्रे घेतली.

खेळ व कृतिसत्रे चालू असताना पालकांना स्वतःच्याच मुलांचे निरीक्षण करून त्यांच्या नोंदी करायची सवय लागावी यासाठी त्यांना दरमहा नोंदी लिहून आणायला सांगितले व त्यावर चर्चा झाली. वरीलपैकी ५ गावांमधील अभ्यासक्रम पूर्ण झाला आणि सध्या बोरावळे व कुसगाव येथील वर्ग चालू आहे.

**हिरकणींचा मेळावा:–** सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त ३जानेवारी २०१५ रोजी एक मेळावा झाला. या मेळाव्याला १६ गावांमधून ६३हिरकणी उपस्थित होत्या. बाल शिक्षण तज्ज्ञ मा. रजनीताई दाते मेळाव्यास मार्गदर्शन करण्यासाठी पुण्याहून आल्या होत्या. हिरकणीतील सत्रांमुळे आणि प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे मुलांकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन कसा बदलला, याबद्दल काही जणींनी अनुभवकथन केले.



| क्र. | गावाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| १ | गेळगणे | १२ |
| २ | कोदापूर | १० |
| ३ | जाधववाडी | ९ |
| ४ | रायदंडवाडी | १२ |
| ५ | कुसगाव | १४ |
| ६ | माझगाव | ९ |
| ७ | देवपाल | १२ |
| ८ | सणस वाडी | १० |
| | एकूण संख्या | ८५ |

# ■ महिला विकास

## व्यक्तिमत्त्व विकसन

**संधी!**
शिवऱ्यातील एकीने बचतगटाच्या अर्थसाहाय्यातून झेरॉक्सचे मशीन घेतले. शाळेच्या जवळच घर असलेल्या या ताईनी त्यानंतर ४ महिन्यातच सर्व मशीनची किंमत वसूल होणारा धंदा केला. १०वीची परीक्षा झाली आणि झेरॉक्स मशीनला कामच काम मिळाले. शाळाही तिथेच होती आणि तिचे घरही. पण ही संधी तिला दिसली ते तिच्या बचतगटाच्या अनुभवामुळे!

**✻ बचतगटः** बचतगटांच्या माध्यमातून महिला एकत्र येतात. आता काही भांडवली गट सुरू करुनही ५-६ वर्षे झाली. या गटात बचतच मुळी व्यवसायासाठी होते. एकूण ३५ गावांमधल्या २९० गटांची चालू बचत १.६७ कोटी आहे तर ४.२० कोटींचे कर्जव्यवहार त्यांनी केले. त्यापैकी २.५५ कोटी येणे बाकी आहे. यावर ६७ लाख रुपयांचे व्याज गटांना मिळाले आहे.

**✻ हिशोब तपासणीचे मेळावेः**११ गावात हिशोबतपासणीचे मेळावे झाले. त्यात द्विदशकपूर्ती मेळाव्याचे गावनिहाय नियोजन झाले. ६५०जणींचा या मेळाव्यात सहभाग होता.

**✻ नाबार्डः** 'नाबार्ड' च्या ॲड ऑन ३ या प्रकल्पाच्या माध्यमातून आपण १५ गावांमधील ९० गटांपर्यंत आजपर्यंत पोहोचलो आहोत. शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यातील ८१ गटांनी बँकेत खाती काढली असून ५३ गटांना ५४ लाख रुपयाचे कर्ज मिळून बँकजोडणी झाली आहे.

**✻ चौकटी बाहेर पडण्यासाठी सहलीचा अनुभवः** गावागावांमधल्या स्थानिक महिलांच्या आपण सहली सुरू केल्या. या सहली चौकटीबाहेरच्या म्हणजेच फक्त देवदर्शनासाठी बाहेर पडायचे अशा नाहीत. वेगवेगळ्या सामाजिक संस्था तसेच विकासाचे प्रकल्प पाहणे यांनाही देवदर्शनाइतकेच महत्त्व द्यायचे. महिलांनी स्वतःहून घराबाहेर पडून घराबाहेरचे जग पाहावे, वेगवेगळ्या गोष्टी शिकाव्यात, स्वतः पुढाकार घेऊन सहलीचे नियोजन करावे, रेल्वेची तिकिटे काढणे, प्रवासातील भोजन व्यवस्था करणे, कमीतकमी पैशांमध्ये राहण्याची व्यवस्था करणे असे नियोजनाचे त्यांचे कौशल्य वाढावे यासाठी या सहलींचे आयोजन केले जाते. त्याचा उपयोग त्यांना गावपातळीवरील त्यांच्या कामाचे नियोजन करण्यासाठी होतो. यावर्षी खालील सहली झाल्या.

**नवरात्र सहलः** रांझे गावातील १८ महिलांची नवरात्रीच्या निमित्ताने कोल्हापूरच्या देवीच्या दर्शनाची सहल झाली. तसेच ज्योतिबाचे दर्शनही झाले. ही सहल महिलांनी पूर्ण स्वखर्चाने केली.

**तिरुपती बालाजी सहलीः** या वर्षी रहाटवडे, शिवरे आणि अन्य दोन गावांमधील ५५ महिला स्वतः नियोजन करून तिरुपती येथे जाऊन आल्या. आजपर्यंत तिरुपती येथे सहा सहलींमधून ३५० महिला स्वखर्चाने जाऊन आल्या. सुरूवातीला भारतीताई खासबागे या सहलींचे नियोजन करीत. आता गावातल्या महिला स्वतःच संपूर्ण सहलीचे नियोजन करतात.

**कॅन्सर विषयक तपासणी.....नकोरे बाबा**
महिला तपासणींमध्ये कॅन्सर विषयक तपासणीचे शिबिर आले की महिलांचा नकार ठरलेला. एवढी वर्षे काम करून ही जागृती का होत नाही म्हणून एकीला तसे विचारल्यावर म्हणाली, 'ताई तपासणीत काही निघालं तर उपचारांकरता पैसे नकोत का?' त्यासाठी घरातून पैसे बाजूला काढले जातील याची खात्री कोणाला आहे?......म्हणूनच जिथे बचतगट चांगले चालतात तिथे आरोग्य तपासणीला प्रतिसाद चांगला होता कारण..... उपचारासाठी पैसे लागले तर गट पाठीशी उभा राहील ही खात्री होती......बाईच्या आजारपणाला प्राधान्य हवे तर तिचा बचतगटच तिच्या उपयोगाला येणार....हे वास्तव मनाला अजूनही अस्वस्थ करते.

## स्वयंरोजगार प्रशिक्षण व उद्योजकता

**✻ उद्योजकता सहलः** कुसगावातील धनगर वस्तीतील १४महिलांची पुणे येथे सहल झाली. या सहलीत कात्रज दूध डेअरी बरोबरच महिलांनी एका मॉलला भेट दिली. बऱ्याच जणींनी पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या मॉलला भेट दिली. मालाचे पॅकिंग,त्याचे वजन, मालाची मांडणी आणि आकर्षक रचना याविषयी त्यांचे प्रशिक्षण झाले. धनगर वस्तीतील अनेकजणींनी पहिल्यांदाच त्यांची वस्ती सोडून पुण्यापर्यंत प्रवास केला.त्यांनी चतुश्रृंगीदेवीचे दर्शनही घेतले.

**✻ शहरवासियांना ग्रामीण जीवन परिचय :** ग्रामीण भागातील महिलांच्या उद्योजकतेला पुढावा देण्यासाठी गंगोत्री-स्थापत्य तर्फे काही निधी दिला जातो. यावर्षी एकूण ८ सहलींमधून ५०० शहरवासीयांनी मावळातील ग्रामीण भागास भेट दिली. महिलांनी कृषिपर्यटनाद्वारे स्वतःच्या गावात राहून चार पैसे मिळवावेत यासाठी अनुभवांमधून प्रशिक्षणाचे काम या निधीमधून होत असते. यातूनच गावपातळीवरील महिला उद्योजिका हळूहळू तयार होत आहेत.

पावसाळी काळात सहलीच्या निमित्ताने आलेले शहरवासीय भातलावणीमध्ये सहभागी

होऊन शेताशी आणि शेतकऱ्यांच्या जीवनाशी एकरूप होण्याचा प्रयत्न करतात. कित्येक मुलांनी भातलावणीच्या सहलीवरून परत आल्यावर," मी पानात भात टाकून देण्याचे सोडले', असेही सांगितल्याचा अनुभव आहे. शहरवासियांना निसर्गाचा अनुभव तर गावातील लोकांना चार पैसे जोडण्याची संधी, असा या सहलींचा हेतू असतो.

या उपक्रमामधून ग्रामीण जीवन परिचय सहली (२५,०००रु.) खाद्यपदार्थ विक्री (२५,०००रु.) पारंपरिक खेळ (१०,०००रु.) अशी एकूण ६०,०००रु. ची उलाढाल या निमित्ताने झाली.


**✻ नवे उद्योगः** या वर्षी सुरू झालेले नवे उद्योग पुढील प्रमाणे– शेवई मशिनः–शिवरे, आंबवणे या दोन ठिकाणीदोन शेवईचे युनिट चालू केले. १ टेलरिंग दुकान टाकले आहे. शिवापूर येथे हॉटेल तर सांगवीस पार्लर सुरू झाले.

**✻ उद्योजिका मेळावाः**–शिवापूर येथे उद्योजिकांचा मेळावा झाला. त्या मेळाव्यास ६० उद्योजिका उपस्थित होत्या. बचतगटांच्या माध्यमातून अर्थसाहाय्य घेऊन सुरू केलेल्या उद्योगांची सविस्तर माहिती गोळा करण्यात आली.

**✻ विक्रीस मदत :** या वर्षी ७५ किलो तीळवडीच्या विक्रीस मदत केली. तर ४० किलो फराळ उत्पादन व विक्री झाली. २०० किलो विनापॉलीश तांदुळाची विक्री झाली.

## महिला आरोग्य

**✻ गरोदर महिलांची मासिक तपासणीः** डॉ. पाटणकर मेडिकल फाऊंडेशन या ट्रस्टच्या वतीने गेल्या ८ वर्षांपासून आंबवणे येथे गरोदर महिलांची तपासणी होते. त्यांना मोफत औषधे दिली जातात. आरोग्याचे प्रश्न असलेल्या महिलांची आवश्यकतेनुसार पुढील उपचार व शस्त्रक्रियाही पाटणकर नर्सिंग होम येथे सवलतीच्या दरात होतात. वर्षभरात साधारण ८० गावांमधील महिला याचा लाभ घेतात. यावर्षी ज्यांनी लाभ घेतला त्यांची संख्या पुढील प्रमाणे–



**गरोदर महिला तपासणीः–एप्रिल २०१४ ते मार्च २०१५**
**दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी तपासलेल्या पेशंटची संख्या**

| क्र. | महिना | गावे | गरोदर | वंध्यत्व | स्त्रीरोग | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल | ३० | ३९ | ५ | ४ | ४७ |
| २ | मे | ३८ | ४६ | ७ | ५ | ५८ |
| ३ | जून | ३४ | ५० | ४ | १ | ५५ |
| ४ | जुलै | २८ | ५२ | ३ | २ | ५७ |
| ५ | ऑग | ३७ | ६० | ७ | ६ | ७३ |
| ६ | सप्टें | ३३ | ५१ | ५ | २ | ५८ |
| ७ | ऑक्टो | ३५ | ४० | ८ | ४ | ५२ |
| ८ | नोव्हें | १३ | ४० | ३ | १४ | ५७ |
| ९ | डिसें | २७ | ४० | ५ | ११ | ५६ |
| १० | जान | ३१ | ४३ | २ | १३ | ५८ |
| ११ | फेब्रु | २५ | ३४ | ६ | ४ | ४४ |
| १२ | मार्च | २५ | ४० | ८ | ५ | ५३ |



**✻ रक्त तपासणी शिबिरेः** ८ गावांमध्ये हिमोग्राम तपासणी झाली. त्याला ४८५ स्त्री–पुरूष उपस्थित होते. त्यावेळी डॉ. मनिषा उपाध्ये यांनी रक्ततपासणीचे महत्त्व आणि पंडुरोग होऊ नये म्हणून काय आहार घेतला पाहिजे यावर त्यांनी मार्गदर्शन केले. हिमोग्रामच्या तपासणीमध्ये ४९% रुग्णांना ॲनिमिया झाल्याचे लक्षात आले. मोठ्या माणसांनाही जंत होतात व ते झाल्याने आरोग्यावर काय परिणाम होतो हे सांगून सर्वांना जंतांवरची गोळी देण्यात आली.

**✻ डोळे तपासणी शिबिरेः** शिरवळ नेत्र रुग्णालयाच्या साहाय्याने शिवगंगा गुंजवणी खोऱ्यातील १० गावांमध्ये ५००जणांची डोळे तपासणी झाली. २५ रुग्णांची मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झाली.

**कधीतरी स्वतःच्या आरोग्याचा विचार करा.....**

ऊर्जा या आरोग्य प्रकल्पामध्ये निर्धूर चुलीच्या वापराचा आरोग्यावरील परिणाम अभ्यासायचा होता. घिसर गावातील ५० महिलांच्या फुफ्फुसांची क्षमता मापन करण्यासाठी त्यांना दीनानाथ मंगेशकर रूग्णालयामध्ये घेऊन गेलो होतो. चाचणीचा निकाल आला. ५० पैकी ४८ जणींची फुफ्फुसे लहान मुलांच्या फुफ्फुसाच्या क्षमतेची आहेत! दोघींचे फुफ्फुस चांगल्या क्षमतेचे होते कारण त्या चुली वापरतच नव्हत्या! .....दिवसरात्र कष्ट करणाऱ्या महिलांच्या आरोग्याबाबत जाणीव जागृतीचे किती काम अजून करायचे आहे, याचे ते उदाहरणच होते. कुणी यावर कधी विचारच केला नव्हता. स्वतःकडे कधी पाहिलेच नव्हते.

**❋ कॅन्सर विषयक जाणीव जागृती व महिला तपासणीः–**
दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या डॉ. शुभांगीताई कानिटकर यांच्या साहाय्याने८ शिबिरे झाली. त्यात गर्भाशयाच्या मुखाच्या तसेच स्तनांच्या कॅन्सरविषयक जाणीव जागृतीचे सत्र झाले. या संदर्भातील जाणीव जागृतीचे व्याख्यान ऐकायला १०२ जणी आल्या होत्या. त्याचवेळी ६८ महिलांची पॅप स्मिअर टेस्टही झाली. या तपासणीमध्ये १० महिलांच्याबाबतीत आणखी पुढील तपासणी करायला हवी आहे असे लक्षात आले.

## महिला नेतृत्व

**❋ नवरात्र आणि संक्रांत मेळावेः** महिलांमध्ये नेतृत्व गुण यावेत यासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम गाव पातळीवर त्यांनी करावेत, किंवा त्यांच्या गावातून बाहेर पडून त्यांनी त्यांचे अनुभव इतर गावातील महिलांना सांगावेत अशी योजना असते. यावर्षी यासाठी गावोगावी संक्रात मेळावे तसेच नवरात्र मेळावे यांची योजना होती. विकसित गावांमधील ४४जणींनी विकसनशील गावातील मेळाव्यात अनुभवकथनाची संधी घेतली. ५ गावांमध्ये संक्रांत मेळावे झाले. त्याला १८६ सदस्या उपस्थित होत्या.

एकूण १७ गावांमध्ये असे नवरात्र मेळावे झाले. महिलांना गोळा करणे, त्यांच्यासाठी विविध स्पर्धांची योजना करणे. जिंकलेल्या स्पर्धकांना बक्षिसे देणे, ज्ञान प्रबोधिनीच्या विविध उपक्रमांची माहिती मेळाव्यात उपस्थितांना देणे अशी अनेक कामे त्यानिमित्ताने महिला करतात. या मेळाव्यांना १५ ते ५८ अशा संख्येत एकूण ५१८ जणी उपस्थित होत्या.

**❋ दक्षता समिती सदस्य प्रशिक्षणः–** वेल्हे तालुक्यातील दक्षता समिती सदस्यांचा दरमहा १ असा १२ प्रशिक्षणांचा एक वर्ग पूर्ण झाला.

घरगुती हिंसाचाराला आळा बसावा तसेच महिला सुरक्षा महत्त्वाची ठरावी यासाठी महिला दक्षता समिती कार्यरत असते. वेल्हे तालुक्यातील या समितीच्या सदस्यांना त्यांचे काम अधिक चांगल्या प्रकारे करता यावे म्हणून त्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. समुपदेशन तंत्रे, कायदेविषयक माहिती याबरोबरच दक्षता समितीची कार्यपद्धती यावरील सत्रे झाली. कौटुंबिक न्यायालयातील वकीलांनी मार्गदर्शन केले. तसेच कौटुंबिक न्यायालयातील कार्यकर्त्यांनी पथनाट्याद्वारे त्यांना कौटुंबिक कलहाच्या कारणांविषयी तसेच उपाययोजना करताना घ्यायच्या काळजीविषयक मार्गदर्शन केले. चेतना संस्थेच्या कायदेविषयक सल्ला केंद्रास ८जणींनी भेट दिली.

२१ ते ३५ वयोगटातील ६ जणींच्या प्रश्न सोडविण्यात दक्षता समिती सदस्यांनी पुढाकार घेतला.

**❋ महिला ग्रामसभा आयोजनात स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांसोबत कामः** नेतृत्व संवर्धन केंद्रातील सदस्यांनी १० तर स्पर्धा परीक्षा केंद्रातील १६ अशा एकूण २६ गावांमध्ये ग्रामसभा घडवून आणल्या.

सलग ५ वर्षांपासून आपल्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील भावी अधिकारी हे गावागावात जाऊन ग्रामस्थांना ग्रामसभांचे महत्त्व, त्यातील उपस्थितीची आवश्यकता, विशेषतः महिलांचा त्यातील सहभाग, याविषयी जाणीव–जागृती करीत आहेत. त्या–त्या गावांमधील प्रश्न जाणून घेऊन ग्रामसभेमध्ये त्या प्रश्नांवर चर्चा घडून यावी यासाठी महिलांशी ते बोलतात. ग्रामीण भागात विकास पोहोचताना प्रश्नाविषयीची भूमिका काय असावी असे ग्रामस्थांशी चर्चा करून ते जाणून घेतात.

सर्व गावांमधील ग्रामसभेतील महिलांची उपस्थिती आणि सक्रीय सहभाग यात या ५ वर्षांमध्ये विषेश बदल झालेला जाणवतो आहे.

# विविध प्रकल्प

## बालवाडी प्रकल्प

वेल्हे तालुक्यात अति दुर्गम भागातील वाडी–वस्तीवर काम करताना असे लक्षात आले की शासकीय अंगणवाडी मुख्य गावात असते, पण वाडी–वस्तीवर राहणारी २ ते ५ वर्षे वयोगटातील मुले अशा अंगणवाडीत जाऊ शकत नाहीत कारण गावापासून वस्तीचे अंतर बरेच (साधारण ३ ते ५ कि.मी.) असते. म्हणूनच प्रबोधिनीने खाजगी बालवाडीला सुरुवात केली.

या वर्गासाठी स्थानिक शिक्षिका असणे महत्त्वाचे होते. या वस्त्यांवर १०वी पास महिला मिळणे अवघड असतं, तरी त्यातल्या त्यात जास्त शिकलेली स्थानिक शिक्षिका मिळेल असे पाहिले. निवड झाल्यावर त्यांच्यासाठी शास्त्रशुद्ध बाल शिक्षण पद्धत माहिती होण्यासाठी प्रबोधिनीच्या वेल्हे कार्यालयात मासिक प्रशिक्षण सुरू केले आहे. दर महिन्याला होणाऱ्या या प्रशिक्षणामध्ये महिन्याभराचे दिवसानुसार नियोजन करून दिले जाते व त्याचा सरावही बैठकीत घेतला जातो. तृप्तीताई कुलकर्णी, सुषमाताई दाबके आणि पूनमताई साठे या प्रशिक्षण देतात.

दुर्गम भाग व कधीही शाळेत न गेलेले बहुसंख्य पालक असे या वर्गाचे वैशिष्ट्य असल्यामुळे हे वर्ग सुरळीत चालण्यासाठी पालकांचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे, असे या वर्षी प्रकर्षाने लक्षात आले. म्हणून नियमित पालकसभा घेतल्या. या वर्षात ८ गावात पालकसभा झाल्या. हा प्रकल्प किमान तीन वर्षे चालावा यासाठी मा. विजयाताई रसाळ यांनी निधी संकलन केले. ह्या प्रकल्पासाठी एकूण ६५ जणांनी रु. १०१/- पासून रु. १८,०००/- अर्थसाहाय्य दिले.

**प्रशिक्षक प्रशिक्षणः** स्थानिक बालवाडी प्रशिक्षिकांचे महिन्यातून एकदा वेल्हे येथे प्रशिक्षण होते. यात बालवाडीची संकल्पना स्पष्ट केली जाते. बालवाडीतील मुलांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासासाठी कोणकोणत्या गोष्टी बालवाडीताईने करणे अपेक्षित आहे हे त्यांना विविध खेळ, उपक्रम आणि गाण्यांच्या माध्यमातून सांगितले जाते. त्यांचा सराव घेतला जातो. त्यांनी बालवाड्यांमधून जे प्रशिक्षण मुलांना द्यायचे आहे, त्याची रंगीत तालीम करून घेतली जाते.

हे प्रशिक्षण घेण्यासाठी तृप्तीताई कुलकर्णी, सुषमाताई दाबके, आणि पूनमताई साठे प्रशिक्षिका काम करतात.

**पालकसभाः** गेल्या वर्षभरात मिळून ८ शाळांमधील पालकांच्या गावपातळीवरील ६ पालकसभा झाल्या. प्रत्येक पालकसभेत आईप्रमाणेच वडिलांचीही लक्षणीय उपस्थिती होती.

**मुलांच्या दाताची काळजी : पालक मार्गदर्शन :** लहान मुलांच्या दातांची काळजी कशी घ्यायची यावर मार्गदर्शन करायला पुण्यातील डॉ. आशुतोष जावडेकर व त्यांच्या ३ सहकाऱ्यांचा गट वेल्हे येथे आला होता. ८ गावांमधील बालवाड्यांमधील ६० पालक वेल्ह्याला आले. या कार्यक्रमासाठी २५ आंगणवाडी कार्यकर्त्या उपस्थित होत्या. एकूण १५० जणांचा गट उपस्थित होता. डॉक्टरांनी प्रतिकृतीच्या साहाय्याने दातांची काळजी कशी घ्यावी याविषयीचे गटा-गटांमधून मार्गदर्शन केले.

## राम-सीता पुराणिक तंत्रनिकेतन

तंत्र निकेतनातर्फे महिलांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देऊन त्यातून त्यांनी काही उत्पादने करावीत, चार पैसे जोडावेत,असा प्रयत्न असतो. शिवापूर येथे गेल्या १५ वर्षांपासून महिला स्वयंरोजगार प्रशिक्षणाचे काम करीत असलेल्या या उपक्रमात यावर्षी पुढील कामे झाली.

**✱ लोकर कामः** या वर्षी लोकरीचे विणकाम करणे व छोटा रुमाल बनविणे अशी २ प्रशिक्षणे झाली. त्यात ज्यांना काम चांगले जमले अशांसाठी पुण्यातून नगावर कामाची संधी उपलब्ध करून दिली. असे काम या प्रशिक्षणातील एकूण ७ महिलांनी केले. त्यातून त्यांनी चार महिन्यांमध्ये १०,०००/-रुपये करणावळ मिळविली.

**✱ पिशवी शिलाई युनिटः** प्लॅस्टिकच्या कॅरीबॅगला पर्याय म्हणून जुन्या व नव्या साड्यांपासून छोट्या पिशव्या शिवणे हा व्यवसाय महिलांनी सुरू केला आहे. यामध्ये ४ महिला काम करीत आहेत. हा उपक्रम नोव्हेंबर महिन्यापासून सुरू झाला. एकूण २००० पिशव्या शिवण्यापर्यंत त्यांनी यावर्षी मजल मारली. रोहिणीताई या प्रकल्पाच्या तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून स्वेच्छेने मार्गदर्शन करीत आहेत.

**✱ विविध उत्पादन वर्गः** श्रीरामनगर, आंबवणे, गाऊडदरा आणि शिवापूर या चार गावांमधील ४५ जणींसाठी अनुक्रमे शंकरपाळी, तिळवडी आणि बेसनलाडू बनविण्याचे प्रशिक्षण झाले.

**✱ रबरी शिक्केप्रशिक्षणः** ४ महिलांनी शिक्केकरण्याचे प्रशिक्षण घेतले.

## ऊर्जा आरोग्य प्रकल्प



दीनानाथ मंगेशकर रुग्णालय व सिकोया कंपनी सोबत मावळातील घिसर या गावामध्ये आपण ऊर्जा प्रकल्प करीत आहोत.

वर्षानुवर्षे फुंकणीने चूल फुंकल्यामुळे ज्यांच्या फुफ्फुसांची शक्ती कमी झालेली आहे अशा महिलांच्या आरोग्यासाठी त्यांनी बिनधुराची चूल वापरणे किती अत्यावश्यक आहे, हे त्यांच्यापर्यंत पोहोचावे व त्यांच्या आरोग्यविषयक कल्पना स्पष्ट व्हाव्यात म्हणून हा प्रकल्प आपण करीत आहोत.

घिसर-रायदंडवाडी या गावांमधील ५० महिलांना कांडी जळणावर चालणारी

धूरविरहित चूल वापरायला देण्यात आली. ऊर्जाकांडी ही शेतातील टाकाऊ गबाळापासून बनलेली असते. वर्षभर ही चूल आणि कांडी जळण वापरल्यामुळे धूरमुक्त अशा वातावरणात राहून त्यांच्या फुफ्फुसाची कार्यशक्ती सुधारते का, हे पाहण्यासाठी हा संशोधन प्रकल्प चालू आहे. ड़ॉ. मनिषा उपाध्ये या प्रकल्पाचे काम करीत आहेत.

## प्रवास आत्मविश्वासाचा

स्टरलाईट इंडियाच्या सहकार्याने चार महिने कालावधीसाठी झालेल्या या प्रकल्पामध्ये ४ गावांमधून ९८ किशोरी व युवतींसाठी मेळावे झाले. एका गावात हिमोग्लोबीन तपासणी शिबिर तर दोन गावांमध्ये डोळे तपासणी शिबिर झाले.सोंडे सर्पाले येथे शिवणवर्ग झाला. शिवणवर्गाचा लाभ १०जणींनी घेतला.

**जीवन–ज्योती महिला सबलीकरण केंद्र उद्घाटनः** स्टरलाईट फाउंडेशनच्या वतीने करंजावणे गावाजवळ स्टरलाईटच्या जागेत महिला सबलीकरण प्रकल्प '***जीवन ज्योती***' या नावाने ५ सप्टेंबर २०१४ पासून सुरू झाला.महिला व युवती मिळून १५० सदस्य या कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. प्रशिक्षण वर्गात युवतींचे संगणकवर्ग, शिवणवर्ग व साहाय्यक परिचारिका वर्ग सुरू झाले.

या प्रकल्पाचा स्थानिक गावांना प्रचार–प्रसाराची जबाबदारी प्रबोधिनीची होती, त्याशिवाय स्थानिक व्यवस्थापनातही त्यांना सहकार्य केले.

## नसरापूर संवादिनी

नसरापूर येथे पुण्यातील संवादिनीची शाखा सुरू होऊन नुकतेच एक वर्ष पूर्ण झाले. यावर्षी पुढील विषयांवरील कार्यक्रम घेण्यात आले. रूढी–परंपरांविषयीचे समज–गैरसमज,वाचनाचे महत्त्व, मनाचा संयम इ. वर्षभरात मिळून ३ मेळाव्यांना प्रत्येकी २० ते २५ महिला उपस्थित राहिल्या. नवरात्र मेळाव्यामध्ये भोंडला व विविध स्पर्धा झाल्या. उखाण्यांची स्पर्धाही त्यामध्ये झाली. भजन स्पर्धा झाल्या.

**स्त्री शक्ती प्रबोधन ग्रामीण : कार्यकर्त्या**

| | | |
|---|---|---|
| १. | भारती खासबागे | महिला नेतृत्व |
| २. | भारती कामठे | स्वयंरोजगार |
| ३ | आशा सुर्वे | बचतगट प्रमुख |
| ४. | अश्विनी ठाकर | किशोरी विकास उपक्रम |
| ५. | तृप्ती कुलकर्णी | हिरकणी, बालवाडी |
| ६. | मनिषा उपाध्ये | आरोग्य प्रमुख |
| ७ | गंगूताई सांगळे | आरोग्य : क्षेत्र |
| ८. | सुरेखा दिघे | स्वयंरोजगार, वेल्हे |
| ९. | शैला भोंडेकर | वेल्हे केंद्र |
| १०. | प्रतिभा कुंभार | युवती प्रशिक्षण |
| ११ | हिरा जोरवेकर | शवापूर केंद्र बैठक |
| १२. | स्नेहा नित्सुरे | जीवनज्योती |
| १३ | अस्मिता शिळीमकर | कौशल्य तासिका, किशोरी |
| १४ | प्रतिभा स्वामी | युवती महाविद्यालय तासिका |
| १५. | रंजिता सरवदे | सहनिवास |
| १६. | विजया रसाळ | निधी संकलन |
| १७. | दीपाली कामठे | संवादिनी : नसरापूर |
| १८. | कल्पनाताई कुलकर्णी | दूरशिक्षण |

**परदेशी विद्यार्थ्यांसोबत काम:** २०१३ सालापासून ज्ञान प्रबोधिनी आणि अलायन्स फॉर ग्लोबल एज्युकेशन यांचे एकत्रितपणे काम सुरू आहे. यात अमेरिकेतील महाविद्यालयांमधून पदवीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी हे भारतात सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करायला येतात. विविध संस्थांच्या कामातून ते गावागावांमधील काम पाहतात व परिस्थिती जाणून घेतात.

या परदेशी विद्यार्थ्यांमध्ये महिला सक्षमीकरणाचा अभ्यास करणारे विद्यार्थी बचतगटांच्या माध्यमातून झालेल्या बदलांचा अभ्यास करतात. यावर्षी त्यांनी एकूण ४ वेळेला भेटी दिल्या. यात १५ देशांचे ८० विद्यार्थी सहभागी झाले.

या विद्यार्थ्यांनी गावागावातून कार्यकर्ते आणि महिलांच्या मुलाखती घेतल्या. गावभेटी करताना हे परदेशी विद्यार्थी ग्रामीण समाजातील विविध रचना ते समजून घेतात. मंदिरे, शाळा, आंगणवाडी, स्थानिक घरे अशा सर्व सामाजिक व्यवस्था, रचनांना त्यांनी भेटी दिल्या. त्यांच्या भेटींचा गावकऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना चांगला उपयोग होतो आहे. पाहुण्यांसमोर आपले काम आता कार्यकर्ते नेमकेपणाने सांगू लागले आहेत. गावकऱ्यांनाही लांबून आलेल्या पाहुण्यांशी बोलून जगात चाललेल्या गोष्टींची माहिती मिळते व त्यांचे परिस्थितीविषयीचे भान वाढते.

# कामाची दखल

**हैद्राबाद येथील जागतिक परिषदे मध्ये ग्रामीण महिलांच्या कामावरील सादरीकरणेः–** दर तीन वर्षांनी जगभरातील महिलांनी केलेल्या विविध क्षेत्रातील कामांचे व त्या कामांमधील महिलांनी केलेल्या संशोधनांचे सादरीकरण वर्ल्ड वूमन कॉंग्रेसमध्ये होत असते. ते वेगवेगळ्या देशांमध्ये होत असते. जगभरातील विविध देशांमधून त्यावर्षीच्या ठरलेल्या विषयांवरील आपले कामआणि

संशोधन मांडण्यासाठी महिला येत असतात. यावर्षीची ही कॉन्फरन्स भारतात हैद्राबाद येथे होती. यात ७२ देशांमधील ३५२ महिलांची सादरीकरणे झाली. ही संधी साधून ज्ञान प्रबोधिनीतील २२ महिला कार्यकर्त्यांनी आपले निबंध सादर केले. यापैकी आपल्या विभागातर्फे सादर झालेले निबंध खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | आर्थिक साक्षरता चळवळीतून ग्रामीण स्त्री शक्ती प्रबोधन | सुवर्णा गोखले. |
| २. | ग्रामीण युवतींचे सामाजिक बदलाच्या कार्यकर्त्या म्हणून प्रशिक्षण | स्नेहा नित्सुरे. |
| ३. | ग्रामीण बचतगट प्रमुखांच्या आत्मसन्मानाची वाढ | भारती खासबागे, मेगन मॉर्गन. |
| ४. | शिक्षण सुटलेल्या ग्रामीण महिलांचे पदवीपर्यंतचे शिक्षण व त्यातून आर्थिक स्थिरीकरण | डॉ. वनिता पटवर्धन, कल्पना कुलकर्णी. |
| ५. | ग्रामीण महिला नेतृत्वाच्या कार्यस्वरूपात बदल | सुवर्णा गोखले. |
| ६. | कुपोषण मुक्तीसाठी आंगणवाडी शिक्षिकांचे नमुना प्रशिक्षण | डॉ. मनिषा उपाध्ये |
| ७. | ग्रामीण किशोरी व महिलांच्या अभिव्यक्तीतील बदल | सुनीला गोंधळेकर |
| ८. | आंबवणे गावातील किशोरींच्या हिमोग्लोबिनच्या प्रमाणावर पोषक आहाराचा व आहार शिक्षणाचा परिणाम | डॉ. वीणा लिमये. |

**डोंबिवलीच्या कार्यकर्त्या श्रुतीताई फाटक** यांनी कामाला भेट दिली आणि ८दिवस कामातील विविध उपक्रमांची माहिती त्यांनी करून घेतली.

**मेगन मॉर्गनची भेटः–** अलायन्स फॉर ग्लोबल एज्युकेशन याच्या वतीने अमेरिकेतील मेगन मॉर्गन ही युवती २ महिने गाऊडदरा या गावात आपल्या कार्यकर्त्या आशाताई सुर्वे यांच्याकडे राहिली. महिला सक्षमीकरण या विषयावरील तिच्या अभ्यासात तिने महिला सक्षमीकरणातील बचतगटांचा वाटा आणि सक्षमीकरणाचे विविध टप्पे यावर अभ्यास केला.

**कामावरील लेखः**साहित्य प्रेमी भगिनीच्या दिवाळी अंकात प्रबोधिनीच्या ग्रामीण भागातील महिलांच्या कामाविषयी ८ पानी सविस्तर लेख आला.

**युवा पुरस्कारः** जनकल्याण समिती तर्फे सामाजिक काम करणाऱ्या युवा कार्यकर्त्याला देण्यात येणारा 'स्वामी विवेकानंद युवा पुरस्कार' हा ज्ञान प्रबोधिनीच्या किशोरी विकास उपक्रमाच्या कार्यकर्त्या अश्विनीताई ठाकर यांना देण्यात आला.

जनकल्याण समितीच्या महाराष्ट्र प्रांत अध्यक्षा मा. पौर्णिमाताई मेहता यांच्या हस्ते पुरस्कार हा देण्यात आला. रोख रु. ४१,०००/– तसेच मानचिन्ह म्हणून स्वामी विवेकानंदांची मूर्ती, असे पुरस्काराचे स्वरुप होते. प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी उपस्थितांचे संबोधन केले.

**मातृमंदिर पुरस्कारः–**मातृमंदिर विश्वस्त निधी तर्फे सुवर्णाताई गोखले यांचा सत्कार करण्यात आला. रु. ५१,०००/– रोख व मानचिन्ह असे सत्काराचे स्वरुप होते.

**रोटरी क्लब तर्फे पुरस्कारः** ८ मार्च रोजी गांधीभवन रोटरी क्लब तर्फे सुवर्णाताई गोखले यांचा सत्कार करण्यात आला. २० वर्षे अथकपणे ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी तसेच त्यांचा आत्मसन्मान जागा व्हावा म्हणून त्यांनी केलेल्या कामाबद्दल रोटरी क्लबने त्यांना व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार दिला.

# बैठकींद्वारे नियोजन व निवेदन

*** नियोजन व निवेदनाच्या बैठकाः** ५० गावांमधील प्रबोधिका ३ मोठ्या बैठकांद्वारे कामाचे नियोजन करतात. वाजेघर पट्ट्यातल्या प्रबोधिका नवदिशा बैठकी अंतर्गत आंबवणे येथे, तर मावळातील प्रबोधिका तिसऱ्या शनिवारी वेल्हे येथे दरमहा भेटतात. शिवापूर येथे दर महिन्याच्या २२ तारखेला बैठक होते. वर्षभरातील या बैठकामधून खालील विषय झाले.

*** बचतगटांविषयी माहितीः–**गटांविषयीची माहिती देऊन ३९ नवे गट स्थापन करण्याविषयी प्रबोधिकांना सांगितले. प्रबोधिकांनी गावातील महिलांच्या बैठका घेऊन गट स्थापन केले.

*** प्रशिक्षणः–** प्रबोधिकांचे गटाच्या संकल्पने विषयीचे प्रशिक्षण झाले. तसेच जमाखर्च पत्रक भरणे, गटांचा हिशोब, बँकेचे फॉर्म भरणे, गावपातळीवरील बचतगटांचे काम याविषयीचे प्रशिक्षण झाले.



*** ज्ञान प्रबोधिनीच्या विविध उपक्रमांची माहितीः–**जिजामाता प्रबोधन केंद्रातर्फे तालुक्यात घेण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांची माहिती प्रबोधिकांना दिली. यात आरोग्य, हिरकणी, बालवाडी, बचतगट, किशोरी विकास, युवती विकास असे सर्व विषय होते. ज्यांना या उपक्रमांमधून सहभागी व्हायचे आहे, त्यांच्यासाठी तशा सहभागाची व्यवस्था करण्यात आली. ३ गावांमधून ग्रंथालये, हिरकणी प्रकल्पात २ गावांचा सहभाग तर युवतींसाठीच्या प्रकल्पामध्ये अनेक गावांचा सहभाग असे या नवदिशा बैठकीतील प्रमुखांनी उपक्रम घेतले.

*** व्याख्यानेः–** बैठकीतील सदस्यांसाठी दरमहा निरनिराळ्या विषयांवर व्याख्याने झाली.गंगूताई सांगळे,आशाताई सुर्वे, हिराबाई जोरवेकर,शैलाताई भोंडेकर,तृप्तीताई कुलकर्णी, कावेरीताई शिवरकर, स्नेहाताई नित्सुरे आणि सुवर्णाताई गोखले यांनी अनुक्रमे आरोग्य, बचतगट, नेतृत्त्व, पौगंडावस्थेतील प्रश्न, हिरकणी प्रकल्प, बँक जोडणी,

*** बचतगटांची जोडणीः–**नवदिशा बैठकीतील कार्यकर्त्यांमार्फत आजपर्यंत एकूण ३९ गटांना सुरवात झाली. त्यातील २३ गटांची खाती काढून झाली. १२ गटांनी विजया बँकेत खाती काढली तसेच त्यांना १० लक्ष रुपयांचे पहिले कर्जही मिळाले.

*** जिजामाता प्रबोधन केंद्र बैठकः** दर महिन्याच्या २२ तारखेला शिवगंगाखोऱ्यातील कार्यकर्त्या या संपूर्ण कामाचा विचार करण्याकरिता एकत्र येतात. आरोग्य, बचतगट, स्वयंरोजगार, किशोरी विकास या सर्व उपक्रमांतील तपशील ठरवले जातात. काही बैठकांना जोडून जिजामाता प्रबोधन केंद्राच्या कार्यकारिणीच्या बैठका आयोजित केल्या जातात.

*** सुकाणू बैठकः–**शिवगंगा आणि गुंजवणी या दोनही नद्यांच्या खोऱ्यातील पूर्णवेळ स्त्री शक्ती प्रबोधनाचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची एकत्रित सुकाणू बैठक गेल्या दीड वर्षांपासून सुरू झाली आहे. या बैठकीत महिन्याभरात झालेल्या सर्व कामाचे निवेदन होते तर पुढील महिन्यातील कामाचे नियोजन सर्वजणी मिळून करतात. यामुळे कार्यकर्त्यांमधील संवाद वाढला आहे. एकत्रित नियोजनामुळे आपल्याकडील सर्व कामे सर्व क्षेत्रांमध्ये होतात. एकूण २४ कार्यकर्त्या या बैठकीस उपस्थित असतात. स्त्री शक्ती प्रबोधन प्रकल्पा अंतर्गत चालू असणाऱ्या सर्व कामांचे समायोजन या बैठकीमुळे होऊ लागले आहे.

**समारोपः** २०१४–१५ हे वर्ष द्विदशकपूर्तीचे आणि त्यानिमित्तझालेल्या विशेष कार्यक्रमांमुळे अतिशय उत्साहाचे गेले. शिवगंगा–गुंजवणी खोऱ्यांमधील स्थानिक ७५जणी आता एकूण ५,००० ग्रामीण महिलांचे समर्थ नेतृत्व करीत आहेत, हा स्त्री शक्ती प्रबोधनाच्या उद्दिष्टातील महत्त्वाचा टप्पा होय.

✲✲✲✲✲

**विशेष लेखः** वृत्तांत वर्षातील दोन महत्त्वाच्या उपक्रमांवरील सविस्तर लेख कार्यकर्त्यांनी लिहिले आहेत. ते सर्वांच्या संदर्भासाठी सोबत देत आहोत.

## चाकोरीतून बाहेर पडताना...

**सुवर्णाताई गोखले.**

१४ डिसेंबरची २०१४ ची सकाळ, पुण्यातून सकाळी ६.१५ वाजता १० स्कूटर, २ गाड्या निघाल्या. त्यांच्या सोबत १८ सायकली घेऊन एक टेम्पोही निघाला. ताईनी ठरवलेल्या टेम्पोतून कल्याण–कुसगाव या गावातून २६ मुली, त्यातल्या ज्यांच्याकडे सायकली होत्या त्या सायकलींसह निघाल्या. वांगणीगावचा टेम्पो वाडीतल्या,मांगदरीतल्या, कोळवडीच्या अशा ३२ मुलींना घेऊन निघाला. आज लवकर जायचं होतं म्हणून मावळ भागातल्या केळद गावच्या शुभांगीताई यांनी तर ड्रायव्हरला कालच वेळेत निघायला सांगून ठेवलं होतं, त्या ६ मुलींना घेऊन वेळेत पोहोचल्या. तोवर विहीर–धानेप गावातून मंगलताई जीपने युवतीना घेऊन आली तर वेल्ह्याची पिक–अप सुरेखाताई, शैलाताई यांनी पूर्ण भरूनच आणली.

साऱ्याजणी धुक्यातून वाट काढत आंबवण्याला येत होत्या. आज पर्यंत कधीही बघितलं नाही एवढ धुकं होतं. ८–४५ पर्यंत सूर्यही दिसत नव्हता. प्रबोधिनीच्या जीप वर तर स्पीकर लावून घेतलाच होता, त्यावर संयोजक अश्विनीताई ग्रामीण साजात साऱ्यांचे

स्वागत करत होत्या. हा उदंड प्रतिसाद ज्ञान प्रबोधिनीने योजलेल्या मुलींच्या सायकल रॅलीला मिळाला होता. ग्रामीण भागात मुली–महिला यांची अशी पहिल्यांदाच सायकल फेरी ठरवली होती. पुणे जिल्ह्यातल्या सर्वात मागास वेल्हे तालुक्यातला राजगड–तोरणा भागातला मार्ग यासाठी निवडला होता. आंबवणे –मार्गासनी – साखर – चिरमोडी – भागीनघर – कोदवडी – आडवली – करंजावणे – आंबवणे असा २२ किमी. चा रस्ता त्यासाठी ठरवला होता.

८.१५–८.३० पर्यंत बहुतेक साऱ्या जणी जमल्या. घोषणा सुरु झाल्या. 'सायकलची फेरी जणू पंढरीची वारी! 'सायकलची साथ जणू प्रगतीची वाट', 'सायकल चालवूया आरोग्य टिकवूया', 'सायकल अभियान आरोग्याचे वरदान', 'किशोरींची सायकल फेरी मग आम्हालाही सहभागी व्हायचे आहे', अशी युवती, महिला यांच्याकडून मागणी आली आणि म्हणून संपूर्ण स्त्री शक्तीची फेरी ठरवली. ही स्वयंपूर्णतेच्या प्रवासाची सुरुवात होती. या फेरीमागची संकल्पनाच मुली–युवती–महिला यांचे स्वावलंबन अशी होती. त्यामुळे सहभागी झालेल्या वाहनांचे चालकत्व किशोरी–युवती–महिला यांच्याकडे होते ही सगळ्यात जमेची बाजू.



पूर्वतयारी म्हणून गावागावात शाळेत जाऊन किशोरींना सायकलने येण्याचे आवाहन केले होते. शाळेतले कुठलेही सर उत्सुकतेने फारसा पाठिंबा देत नव्हते. २२ किमी. म्हणजे जरा जास्तच होतंय असे ऐकणाऱ्या प्रत्येकालाच वाटत होते. या भागात मुलांची सुद्धा अशी फेरी यापूर्वी कधी झाली नव्हती, म्हणूनही अनेकांच्या मनात शंका येत होती. तरीही मुली नावे देत होत्या. यादी साधारण ९० पर्यंत पोचली. १०० तरी करू म्हणून थोडा जोर लावत होतो, कुणी म्हणत होते 'ही नुसती नावे आहेत उद्या बघा किती येतात.... 'निम्म्या सुद्धा यायच्या नाहीत!' तरीही अश्विनीताई अजिबात विचलित होत नव्हत्या. 'ताई नाव दिलेल्या सगळ्या नक्की येणार'! ... 'मुलींच्या चेहेऱ्यावर तसा ठामपणा दिसतोय. पण त्यांच्याकडे सायकली नाहीत. काय करुया?' चर्चा करून ठरलं की पुण्यातल्या प्रबोधिनीच्या शाळेतल्या मुलींना आवाहन करूया आणि तसं करून त्यातून १८ सायकली त्या दिवशी पुरत्या वापरायला मिळवल्या. जीवन ज्योती प्रकल्पाच्या २० सायकली वापरायला मिळणार होत्या. स्थानिक १३ मुली सायकलसह येणार होत्या. म्हणजे ५० सायकली झाल्या. म्हणजे २ मुलीत मिळून एक सायकल धरली तर सगळ्यांची सोय झाली होती. आदल्या दिवशी मार्गावरच्या सगळ्या गावात जीप नेउन स्पीकरवर फेरीबद्दल सांगितले होते. 'मुलींचे कौतुक करायला या' असे आवाहनही केले होते. १४ डिसेंबरला ठरलेल्या दिवशी भारावलेल्या वातावरणात सकाळी ठीक ९ वाजता ठरलेल्या वेळी फेरी सुरु झाली. रॅलीचे उद्घाटन पासष्टी ओलांडलेल्या विजयाताई व कल्पनाताई अशा २ आजींनी स्वतः सायकल चालवून केले. कृतीने असा हिरवा झेंडा दाखवला. त्यांच्या मागे ५० सायकलींवर किशोरी–युवती, त्याशिवाय १० स्कूटर, २ गाड्या आणि १७० जणी (३ किमी पदयात्रा करायला) निघाल्या. १०० नावनोंदणी पैकी १४० हजर होत्या. या सगळ्या जणी ३९ गावांमधून आल्या होत्या. ३किमी पदयात्रा झाल्यावर मुलींना आणलेल्या टेम्पोतून उरलेला गट सायकल रॅलीमागे आला. सगळ्या गावात उत्स्फूर्त स्वागत होत होतं. लोकं किशोरी–युवतींना इतक्या मोठ्ठ्या संख्येने सायकल चालवताना प्रथमच बघत होते एक एक गाव मागं पडत होतं. गाडीवाले सुद्धा थांबून मुलींना वाट करून देत होते. भागीनघरला तर गावातल्या महिलांनी पहिल्या पोहोचलेल्या मुलीला ओवाळले, साऱ्यांना साखर दिली तर संस्थेचा सत्कार केला. तिथे ११ किमी पूर्ण होत होते. सायकल स्वारांना म्हंटले, 'जरा विश्रांती घ्या, सायकल बदला आता', तर विश्रांतीही न घेता काहीजणी जोरात पुढं गेल्या आणि सायकल शेवटपर्यंत चालवणाऱ्या अनेक जणी निघाल्या. पण बाकीच्यांनी मात्र ठरल्या प्रमाणे इतर मैत्रिणींनाही मिळावी म्हणून सायकल सोडली.

गेली ५ वर्षे मुलींनी सायकलने शाळेत जावे म्हणून सायकल वाटप करत होतो पण 'पद्धत नाही', 'लाज वाटते', 'लोकं काय म्हणतील' या भीतीने मुली सायकल चालवत नव्हत्या. रोज १०किमी पेक्षा जास्त चाललं तरच ८वीच्या पुढची शाळा होणार हे वास्तव होतं. शासनाने बस पास दिले पण वेळेवर बस उपलब्धच नाही त्यांचे काय? मग भले शिक्षण थांबलं तरी चालेल पण उगाच 'माझी सायकल' हा चर्चेचा विषय नको असं वाटणाऱ्या, ह्याच का त्या मुली? असा प्रश्न पुन्हा पुन्हा मला पडत होता. खरतर 'मुलीने सायकल चालवणे' याविषयीची दृष्टी बदलणे हा या रॅलीचा अंतःस्थ हेतू होता.



पुढंच गाव होतं कोदवडी. तिथं प्रबोधिनीचे बचत गटाचे काम होतं. त्या महिलांना इतका उत्साह की त्यांनी सगळ्यांसाठी सरबत केले

**सायकल वाटप : नवी मैत्रिण : नवी सोबत**

गावापासून लांब शाळा आणि चांगल्या दळण-वळणाच्या सोयींचा अभाव या कारणामुळे ज्या मुलींची शाळा सुटत होती, शाळेत जायला सोबत करण्यासाठी कोणी मैत्रिण नाही, म्हणून जिला शाळेत जाता येत नव्हते, अशा मुलींनी सायकल वापरावी यासाठी आपण प्रयत्न केले. इनरव्हिल क्लब, कॉग्निझंट सारख्या देणगीदारांनी तर कधी संत्रिकेतील म्हसकर गुरूजींसारख्या ज्येष्ठांनी सायकली दिल्या. कधी कोणी वापरलेल्या सायकली दुरूस्त करून मैत्रिणीसाठी दिल्या. पण सायकल रॅलीमुळे सायकलींच्या वापराला एक उत्साह आला. यावर्षी अशा ३० जणींना अशा सायकली मिळाल्या. आता त्याच त्यांच्या मेत्रिणी! त्याच त्यांची सोबत!

होते ...२५० ग्लास! गावातल्या मुली, बायका,पुरुष सगळे फाट्यावर आले होते. अशी सायकल रॅली बघायला गावातली १२५ माणसं तरी हजर होती. पुन्हा घोषणा झाल्या. वातावरण इतकं उत्साही होतं की एका गावकऱ्याने म्हंटले, 'ताई माझ्या कडून सगळ्यांना बिस्किटे द्या.' तिथल्या टपरीतून स्वतःच्या नावावर उधारीवर त्याने ५० बिस्कीट पुडे घेऊन उत्स्फूर्तपणे वाटले. मनात आलं, 'याला म्हणायचं लोकसहभाग.' त्यामुळे त्या गावातल्या काही मुली आल्या व म्हणाल्या, 'ताई आम्ही रॅलीसाठी नाव दिलं नाही, तरी येऊ का?' अर्थातच 'हो' म्हटलं. तर ४ जणी मागून येऊन म्हणाल्या, 'ताई, भागीनघर वरून आम्ही आलो सुद्धा!' उत्स्फूर्त सहभाग होता त्यांचा... हक्कानं, आपुलकीनं .... अशा एखाद्या दिवशीच्या वातावरणानं सुद्धा 'उद्याचं वातावरण नक्की बदलेल'....याची खात्री वाटत होती.

अतिशय चढ उताराचा रस्ता आता संपत आला होता. पण खराब रस्ता सुरु झाला. पुण्यातून आलेल्या स्कूटरवाल्या म्हणायला लागल्या, 'आमची मोटोक्रॉसची तयारी झाली!' ते खडबडीत३ किमी संपले तर रॅलीत सहभागी व्हायला आलेली बैलगाडी उभी होती. एक सुखद धक्का होता. भारतीताईनं हातात कासरा धरला नि म्हणाली, 'चल रे माझ्या राजा!' मग टेम्पो थांबवून त्यातून काही जणी पटापट उतरल्या नि बैलगाडीवर आरूढ झाल्या. स्त्री शक्तीचा बॅनर तिथेही लागला!.

या रॅलीत बचत गट घेणाऱ्या गाव प्रतिनिधी प्रबोधिनीच्या साडी गणवेशात सहभागी झाल्या होत्या. त्यात काही नऊवारी साडीवाल्याही होत्या. याचंही अप्रूप काहीना वाटलं. सर्व समावेशक काम करायचं तर या साऱ्याचा विचार करावा लागतो. तर मग त्यांनाही आपल्या गावातल्या मुली सहभागी व्हायला हव्यात, असं स्वाभाविकपणे वाटायला लागत. कुसगावची ईश्वरी अवघी ७ वर्षाची. गुडघाभर सायकलवर १६ किमी चालवत आली होती. ती कौतुकाचा विषय झाली होती. असाही हट्ट करता यायला हवा हे न सांगताच कळत होत.

म्हणता म्हणता अवघ्या १२० मिनिटात २ वेळा थांबूनही रॅलीतील पहिली मुलगी पोहोचली, अर्ध्या तासात शेवटचीही पोचली. फेरी संपली. घामाघूम झालेल्या मुलींचा चेहेरा वेगळ्याच उत्साहानं ओसंडलेला दिसत होता. 'आम्ही केलं'... याचा आनंद काही औरच होता. मग जी पडली होती तिला कसं लागलंच नाही, घाम आला पण पाणीच विसरलं तरी तहान लागलीच नाही अशा चर्चा आनंदानं ऐकू यायला लागल्या. पहिलीच वेळ असल्यामुळे संयोजनामध्ये काही चुका झाल्या तरी गैरसोयीबद्दल एकीचीही तक्रार ऐकली नाही.

एकत्र सगळ्या बसलो. कसं वाटलं विचारल्यावर साऱ्यांचं उत्तर होतं 'लई भारी!' '..आई नकोच म्हणत होती पण तुमचं नाव सांगितलं '.... आम्ही ठरवलं... आम्ही केलं..... आम्हाला जमलं!!' असं त्यांची प्रत्येक कृती सांगत होती की 'आम्ही जिंकलो!' मग ती २२ किमी चालवणारी गावातली असो नाहीतर १००किमी प्रथमच चालवणारी पुण्यातली असो, नाहीतर बैलगाडी जुम्पणारी असो, सगळ्यांना एकच वाटत होतं..... 'आधीच करायला हवं होतं.... जरा उशीरच झाला ... आपण उगाच घाबरत होतो. किती सहज जमलं.... ठरवण्याचीच खोटी होती!'

काहीतरी उत्तम घडणार असं आम्हा संयोजकांना वाटतंच होतं म्हणून आम्ही व्हिडीओ कॅमेरा सोबत ठेवला होता. 'कोणाला काय कॅमेरा समोर उभं राहून सांगायचं आहे का?' असं विचारल्यावर फेरी सुरु होण्यापूर्वी संकोचणाऱ्या या मुली फेरी संपल्यावर पटापट एक एक जण कॅमेरासमोर उभे राहून मनोगत व्यक्त करत होती. हाच कार्यक्रम पुढचा १ तास चालू होता. हे पाहून या रॅलीतून मला काय शिकायला मिळालं, तर ज्या गोष्टीची कल्पना सुद्धा केली नाही अशी एखादी गोष्ट कोणाच्या तरी आग्रहावरून अचानक केली आणि जमली की आत्मविश्वास उडी घेतल्यासारखा वाढतो .... ही अनुभव घेण्याचीच गोष्ट आहे.

कार्यक्रम संपला. सारे निघाले. पण किशोरींचा एक गट बोलायला घुटमळला, 'काय ग?' म्हंटल्यावर त्यातली एक धिटुकली पुढे झाली. म्हणाली, 'ताई शाळा ४ किमी दूर आहे, शाळेत जायला आम्हाला सायकल द्याल? आता आम्ही सायकल वरून नक्की शाळेला जाऊ!' .... तिचं बोलणं ऐकून सारं पावलं, असंच वाटलं. कार्यक्रमाचा शीण एकदम हलका झाला!!

*****

# द्विदशकपूर्ती मेळावा

**सुवर्णाताई गोखले**



शिबिराच्या पुढच्या सत्रातच मेळाव्याची खाती काढली गेली नि कोणी काय करायचे ते ठरवूनच सगळ्यांची पांगापांग झाली.

..... झालं! सगळ्या कामालाच लागल्या.

उत्स्फूर्त प्रतिसाद! दोन दिवसांनी सुमनताई, शैलाताई, विद्याताई हाय–वे वरच्या शिवराई मंगल कार्यालयात आणि मालक टी एम कोकाटे यांना भेटल्या. म्हणाल्या, 'भाऊ तुमचं नुकसान न करता मुहूर्त नसलेला दिवस, आमच्या महिला मेळाव्याला पैसे न घेता कार्यालय वापरायला द्या की! आमच्यासाठी सगळे दिवसच मुहूर्ताचेच!' .....आणि भाऊंनी हसत हसत परवानगी दिली नि कार्यालयाचा मोकळा दिवस मेळाव्यासाठी दिला १८ एप्रिल २०१५.

अवघ्या ५८ दिवसांनी !...

पाहुणे ठरवायचे होते, पत्रिका छापायच्या होत्या, गावोगावी सांगावा धाडायचा होता ..... सारी चक्रं भराभरा फिरू लागली. 'कोण पाहुण्या बोलवायच्या? बैठकीत चर्चा झाली होती, प्रतिभा पाटील, सुधा कोठारी, पंकजा मुंडे, किरण बेदी, मेधा पाटकर, निरुपमा देशपांडे, आण्णा हजारे...आणि कोण कोण यांची नावे निघाली होती. सगळ्यांसाठी प्रयत्न केले. येण्याचे नक्की केले ते महाराष्ट्रातल्या बचत गट प्रवर्तक सुधा कोठारी आणि मेळघाटात गटाचे काम करणाऱ्या निरुपमा देशपांडे यांनी.

पूर्वतयारीची बैठक बसली. खर्चाचा अंदाज बांधायला सुरुवात केली. खर्च जरा जास्तच म्हणजे लाखांच्या घरात जायला लागला. एवढा खर्च उभा कसा करायचा? कमी कसा करायचा? चर्चा सुरु झाली. कशामुळे खर्च वाढतोय पाहू म्हणून त्यावर लक्ष टाकलं तर 'जेवण' आणि 'प्रवास' असे दोन महत्त्वाचे मुद्दे लक्षात आले. मग एकेकीनं त्यातला 'स्वतःचा' खारीचा वाटा उचलायला सुरुवात केली. कोणी मसाला देते म्हणाली, तर कोणी शिऱ्यासाठी साखर, रवा देते म्हणाली. कोणी दोघींनी मिळून तेलाचा डबाच द्यायचं ठरवलं. मग 'जेवणाला लागणारा ४०० किलो तांदूळ मावळातून मागवू या' असा एकीने प्रस्ताव मांडला हेतू होता की मावळातल्या आपल्या गटांनाही सहभागाचा आनंद द्यायला हवा ना? त्यांनाही मेळावा आमचा आहे असे वाटायला हवे ...!

सामान जमलं!..... महिलांच्या येण्याची जबाबदारी घेतली....मग योजक गटातल्या एकेकीनं गावं वाटून घेतली. कुणी आतल्या गाव प्रतिनिधींची बैठक घेतली तर कुणी हाय–वे वरच्या गावाच्या प्रतिनिधींची बैठक घेतली, कुणी गावोगाव फिरून औताण दिलं. मग एकत्र गाववार कोण किती महिला आणते असे म्हटले अशी यादी केली तर संख्या झाली ३२००! ठरलेलं ३०००+ असं उद्दिष्ट ६० गांवाच्या संख्येतून पूर्ण होणार अशी चिन्ह दिसायला लागली.

....... म्हणता म्हणता सारं सामान कार्यालयात दाखलही व्हायला लागलं. तांदूळ भरपूर झाले. मग कोणी कांदे दिले तर कोणी बटाटे. कोणी वांग्याचा तोडा असा केला की मेळाव्याला ताजी वांगी मिळतील. एरवी बैठकीला 'फुलाचा तोडा आहे' म्हणून ज्या यायच्या नाहीत अशांना निरोप गेले की आजचा तोडा मेळाव्याच्या नावाने धरा, नि सारं कार्यालय फुलांनी सजवून टाका. त्यांनी आदल्या दिवशीच १०० किलो फुलं खोपी गावात पोच केली. मग एकीनं गावभरच्या पोरी बायका गोळा केल्या तर दुसरीनं एक जागी बसून त्यांना कामाला लावले. सगळ्या फुलांचे हार करून घेतले. सारा गाव कामाला लागला. 'आज हार करा, उद्या जेवायला या', अशी मेळाव्याची स्कीम काढली आम्ही', गाव प्रतिनिधी हसत हसत सांगत होती..... तोवर एका गावातून निरोप आला शेजारच्या गावाची यात्रा आहे महिला येणार नाही म्हणतात, तर दुसऱ्या गावात नेमका लग्नाचा मुहूर्त आहे, त्या गावात शासनाने वेळ साधून नेमकं तेव्हाच शिबिर

ठेवलंय, त्या बाया येतील असं वाटत नाही, शिबिराला बसलं की पैसे मिळतात!.... आता कसं होणार असं मनात आलं ..पण काहींनी दुप्पट बायका जमवल्या, एक जीप पुरणार नाही टेम्पोने येतो, असाही फोन केला. जरा धीर आला!

मेळाव्याचा आदला दिवस ...१७ एप्रिल. दुपारचे ३ वाजले होते. तयारीच्या साऱ्या जणी कार्यालयात जमल्या.... हार आले....बॅनरआले......स्टॉलसाठी मंडप लागला.... स्टेज सजलं! ....मग साऱ्या जेवणाच्या हॉलपाशी गेलो. प्रत्येक टेबलं लावून पाहिली, 'एकावेळी फक्त ५००च बसतात, कसं चालेल?' 'कधी ग उरकायची मग एवढ्यांची जेवणं?' अशा चर्चा सुरू झाल्या ..... तो वर खुर्च्या लागल्या..... त्याही फक्त २००० लागल्या. बाकीच्यांना कुठे बसवायचे? चर्चा गांभीर्याने व्हायला लागल्या. 'पुरेत की एवढ्या' म्हणणारीही होतीच,लग्नाचं ठीक आहे पण मेळाव्याला कसं चालेल? 'गावोगावच्या बायका बैठकीत म्हणाल्या त्याप्रमाणे ३२००जणी आल्या तर काय परत पाठवायच्यात का?...जागा संपली म्हणून?'...... 'तेही खरंच. मग असं करू ह्यातल्या ५०० खुर्च्या उचलू नि पुढं सतरंज्या घालू. बाया मांडी घालून बसल्या की एवढ्या जागेत २०००बायका मावतील. मग या म्हणावं किती येताय ते!' तोवर



रात्रीचे ८ वाजून गेले होते. अवघ्या १३ तासात पहिले गट पोचणार होते. बसायचा निर्णय तर घेतला, पण एवढ्या संख्येसाठी सतरंज्या आत्ता कोण देणार? साऱ्या विचारात पडल्या. तेवढ्यात एक म्हणाली, 'आमचे कांदे आहेत, शेतात कांदा काढला की पाऊस हमखास येतो तर कांदा भिजू नये म्हणून आमच्याकडे झाकायचं आहे, तेच अंथरू इथे!' 'एवढच कसं पुरेल?' दुसरी तिला म्हणाली. ती फणकारून म्हणाली, 'ए मी काय गुंठाभर कांदे नाही करत. ते तळवट उचलायला ४ गडी लागतील. १०००–१५०० लोक तर नक्की बसतील त्यावर... अगं वेळ पडली तर त्यात दोन ट्रक कांदे झाकतो आम्ही! उद्या सकाळी ताई गाडी पाठवा माझ्या घरी. मी गावातल्या ४ पोरांना घेऊन इथं हन्तरून घेईन. बाकी कार्यालयातल्या देवळातल्या सतरंज्या आणू या. सप्ता होतो त्या गावात १५०–२०० माणसं बसणारी सतरंजी असतेच...' .... तोवर जेवणखातं आलं, त्या पण म्हणाल्या, 'ताई आम्ही पण खाली बसवून पंगत वाढू, तरच उरकेल!'.... तोवर भाजीचा टेम्पो आला, किराणा आला नि गावाची तरुण मंडळाची पोरं सुद्धा आली.........



भराभर माल काढला त्यांनी! 'चला घरी निघूया, उद्या लवकर यायचं ना?' मी म्हंटल यापुढे एकेकीला घरी पोचायला अर्धा पाऊण तास तरी लागणार होता. तोवर एक युवक म्हणाला, 'ताई सगळं उघड्यावर कसं सोडायचं? इथं कुलूप लावता येण्यासारखं काही नाही... मग?' पहिला प्रश्न सुटे पर्यंत दुसरा दत्त म्हणून उभा... पण मजा अशी होती की सगळ्या महिला अशा उत्साहानं नि अधिकारानं काम करत होत्या की प्रश्नांचाही पत्कर घेत होत्या. त्याच म्हणाल्या, 'मग तुम्ही कशाला आहात? उदयाला मेळाव्यात तुमचं काही काम नाही! आज इथे रहा, उद्या सकाळी स्वयंपाकाच्या मदतीच्या बाया आल्या की जा घरी. आवरून पुन्हा या आमच्या मदतीला!' .... म्हणायचाच अवकाश होता. जणू काही त्यांना हे असं होणार हे माहीतच होतं असं समजून हसत हसत ती तयार झाली. दुसरा पर्यायच नाही हे त्यांनाही माहीत होतं. साऱ्या घरी जाई पर्यंत १० वाजून गेले होते.

दि.१८ चा मेळाव्याचा दिवस उजाडला. ९–९.३० पर्यंत सगळ्यांना यायला सांगितलं होतं. पण स्वतःला जबाबदार समजणाऱ्या साऱ्या ९ पूर्वीच हजर होत्या! .... २५ जणी! 'कधी एकदा उजाडतंय असं झालं होतं, रात्री झोपच लागली नव्हती. पोरांऐवजी आपणच झोपलो असतो इथे तर बरं झालं असतं असं वाटलं!' .. म्हणे म्हणे पर्यंत गट यायला लागले पहिला गट सगळ्यात लांबच्या गावातून कुम्बळ्याहून आला. ६ च्या एस टी ने निघालेला गट ९.३० पर्यंत पोचला, रांगोळीवाल्या आल्या... सुंदर रांगोळी



झाली. स्टॉल सजले, सतरंज्या हॉलभर अंथरल्या..... तोवर भलामोठ्ठा स्क्रीन लागला. त्याचे टेस्टिंग झाले. म्हणता म्हणता नाश्ता आला ... पहिल्या १००० जणींसाठी पोहे तयार झाले... गावोगावच्या गाड्या यायला लागल्या. प्रत्येक गटात निळी गणवेशाची साडीवाली पुढे होऊन नावं नोंदणी करणारीला गावातून आणलेल्या महिलांची यादी देत होती. 'ह्या माझ्या ३५', 'ह्या माझ्या ५५', ह्या माझ्या२२' अशी मालिकाच लागली. बरचीनृत्य करणारा पुणे प्रशालेचा ९वीचा वर्ग पोहोचला ... कल्याणचा ढाल–तलवारचा गट पोहोचला. .. पुण्याचे १५०–२०० पाहुणे आले.

गिरिकंद ट्रॅव्हल्सने या प्रवासासाठी बस दिली. गावोगावच्या महिलांनी कार्यालय भरून गेलं. तोवर एकीनं येऊन सांगितलं की, वेल्ह्यातून १३ गाड्या पुढे आल्या आहेत, पोहोचतीलच इतक्यात ..... सर्व पार्किंग भरलं...४५ गाड्या उभ्या होत्या.... काही जवळची गावे असल्यामुळे चकरा मारत होत्या. गाउडदऱ्याहून तर ट्रक आला. हॉल भरला. ११.१५ वाजता अश्विनीताईनी ध्वजनमस्ते दिले आणि ढोलावर टिपरू पडले. ४० मुली १२ जणीच्या तालावर बर्च्या करत होत्या. साडीतल्या पुण्यातल्या बायका ढोल-ताशे वाजवत होत्या. बघणाऱ्या ग्रामीण बायकांच्या चेहऱ्यावरचं आश्चर्य उतू जात होतं. काही जणी म्हणत होत्या, 'ताई पुढच्या बारीला आम्ही वाजवणार!' कालपर्यंत गावात वाद्याला बाया माणसांनी हात लावायचा नसतो असं म्हणणाऱ्या ग्रामीण बायका आता असं काहीतरी म्हणत होत्या. कान धन्य झाले... हेतू साध्य झाला!

त्या नंतर लगेचच कल्याणच्या पोरींनी तालात ढाल-तलवारचा खेळ केला. नऊवारी नेसलेला सारा गट तालात नाचत होता. कधी ज्याची कल्पनाच केली नाही असं काहीतरी नुसतं प्रेक्षक म्हणून बघण्यापेक्षा 'पुढच्या वेळी मी तिथे असीन.' असं मेळाव्याला आलेल्या प्रत्येक किशोरी-युवतीच काय पण महिलेलाही वाटत होतं. पारणं फिटलं!

मग सगळ्यांना सूचना मिळाली त्या नुसार गटाने तोंड फिरवून मोठ्ठ्या स्क्रीनकडे पाहिले आणि ज्ञान प्रबोधिनीच्या २० वर्षांच्या बचत गटाच्या कामाचा आढावा घेणारी फिल्म सुरु झाली. या LCD च्या भव्य स्क्रीनची मजाच काही और होती. ८x१० फूट अशा भव्य स्क्रिनवर आपल्याच एकेक ताई बचत गटाचे टप्पे उलगडत सांगत होत्या. गटांनी महिलांना फक्त पैशाचे व्यवहार शिकवले नाहीत तर आत्मविश्वास दिला, हे वेगवेगळ्या उदाहरणातून सांगत होत्या. समोर प्रेक्षक म्हणून बसलेल्या अनेकजणी त्या फिल्म मध्ये होत्या..... त्यातही आपलेपणा होता.

मग मेळाव्याच्या पहिल्या सभेचे दीपप्रज्वलन होऊन उद्घाटन झाले. तोवर हॉल तुडुंब भरला. लोंढेच्या लोंढे येत होते. खरोखर बसायला तसूभरही जागा उरली नाही! अडीच, तीन म्हणत म्हणत संख्या ३५००-४००० वर गेली. महिला, युवती, किशोरी सगळ्या आल्या. उदंड प्रतिसाद मिळाला! पाहुण्यांचा परिचय झाला. स्टेजवर नेमकी ५ माणसे बसली होती. घाई नाही, गडबड नाही. सगळं योजलेल्या पद्धतीने चालू होतं. पाहुण्या सुधाताइंनी मार्गदर्शन केलं त्यांच्या सोबत २ जाणकार महिलाही त्यांच्या सोबत आल्या होत्या. त्यांनी विमा व दक्षता समिती बद्दल माहिती दिली. पुढची दिशा किशोरी विकास असेही सांगितले.

मग काकासाहेब सुपनेकर स्मृति प्रतिष्ठानच्यावतीने, गावपातळीवर किमान ५ वर्षे तरी काम करून स्वतःच्या हिमतीवर कुटुंबाला उद्योजकतेतून आधार देणाऱ्या ४ जणींचे सत्कार झाले. त्यानंतर मा. संचालक वाचस्पती गिरीशराव बापट यांनी कामाची भूमिका गोष्टीतून कार्यकर्त्यांना सांगितली. त्यांचे मार्गदर्शन होऊन पहिली सभा संपली. मग जेवायची सुट्टी झाली. तासाभरात ३-४ पंक्ती उठल्या, काही टेबलवर तर काही खाली बसून पंगत करून! जे काम दिसेल ते कोणीतरी करत होते. आपापल्या गावातल्या सगळ्या जेवल्या ना हे सारे त्याच पाहात होत्या. 'कार्यालयाचे वाढपी का एवढं करणार?...घरचं कार्य असलं तर नसतं का वाढलं?' .... या भावनेतून साऱ्या कामाला लागल्या. आम्ही २५०० लोकांचा स्वयंपाक सांगितला, पण आचाऱ्याने ३०००चा केला. लोकं वाढलेली पाहून अजून १,०००चा स्वयंपाक वाढवला, तरी कमी पडेल असं वाटलं आणि ५०० चा केला. ३५०० लोकांच सामान आणलं होतं, मग तरुण मंडळानं पुन्हा सामान आणलं .... पंगती उठेपर्यंत पुढचं जेवण तयार झालं! म्हणता म्हणता ४,५०० लोकांची जेवण उरकली. पण महिलांच्या आग्रहामुळे सारं काम केवळ ३,०००/- रुपयात केलं. पुन्हा पुन्हा केलं. ते सुद्धा चिडचिड न करता..... कारण कार्यक्रम 'आपला' होता, हे त्यांनाही माहीत होते!

काही गाड्या यायला उशीर झाला होता त्यामुळे त्यांची फिल्म पाहून झाली नव्हती. त्यांच्या आग्रहामुळे पुन्हा फिल्म सुरू केली आणि हजारो जणी बिनबोभाट पुन्हा जाग्यावर बसल्या! मग गावच्या पोरींची भजन, पोवाडे झाले. त्यानंतर भारतातल्या पहिल्या डॉक्टर, डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावर एकपात्री प्रयोग करायला पुण्याहून अश्विनीताई जोशी आल्या होत्या. त्यांचा कार्यक्रम झाला. त्या नंतर दुसरी सभा सुरु झाली. त्या सभेत डॉ. निरुपमाताई व प्रबोधिनीचे कार्यवाह सुभाषराव व संचालक गिरीशराव यांच्या हस्ते गावपातळीवर निःस्वार्थीपणे पाच वर्षा पेक्षा जास्त काळ काम करणाऱ्या ८२ जणींचे सत्कार झाले. त्या बरोबरच ज्यांनी काम पुढे नेण्यास मदत केली अशा बँकेच्या व शासनाच्या १७ अधिकाऱ्यांचेही सत्कार झाले. मग डॉ. निरुपमाताईंचे मार्दर्शन झाले. त्यानंतर मा सुभाषरावांनी रौप्य महोत्सवा पर्यंत कामाची वाटचाल कशी करायची यावर मार्गदर्शन केले. मग पुण्याहून आलेल्या महिलांनी पोवाडा म्हटला नि प्रार्थना होऊन कार्यक्रम संपायला ४.३० वाजले.

**मेळावा सफल संपूर्ण झाला!**

कालपासून काम करणारा कार्यकर्त्यांचा गट पुन्हा एकदा पदर खोचून कामाला लागला. अर्ध्या तासात सारे आवरून झाले. सतरंजीची घडी करता करता चर्चा झाली, 'बाहेर गावातून किती येतील असं वाटलं त्या पेक्षा जास्त आल्या', 'राजकारण करताना पुरुष सभा भरवतात, महिला एवढी सभा भरवू शकतात हे त्यांना पण कळलं ते बर झालं'... तोवर एकेका गावातून महिला सुखरूप पोहोचल्याचे फोन यायला सुरुवात झाली. 'ताई एवढ्या लोकात सत्कार झाला बरं वाटलं', 'घरची मंडळी मला मिळालेलं सन्मानचिन्ह

बघून खूश झाली.' 'परतताना सुद्धा साऱ्या गातच होत्या' 'माझी सासू पुढे घरी आली होती तिला लवकर निघाल्याचं वाईट वाटलं', 'गावातल्या बायांना पण माझा सत्कार झाल्यानं हुरूप आला.' 'बाया म्हणत होत्या, असं कध्धी पाहिलं नव्हतं', 'डोळ्याचं पारणच फिटलं जणू' 'आता कशाला घाबरायचं कारणच नाही'. आमचा जीप ड्रायव्हर म्हणाला, 'कुठला बंदोबस्त नाही नि काय नाही, सारं महिलांनी केलं. आता बाया काय ऐकणार नाहीत!' 'आमच्या गावाच्या महिलांना आनंदी आनंद वाटला, गटाचा अभिमान वाटला.'

भारावून दिवस संपला. कर्त्या साऱ्या जणी सुद्धा सर्व उरकून '७च्या आत घरात' पोहोचल्या!

दोन दिवसांनी शोध-बोध बैठक झाली. साऱ्यांना आत्मप्रचीती आली होती. हिशोब म्हणाल्या प्रमाणे कमीत कमीखर्चात पूर्ण झाले होते. शोध-बोध बैठकीतली चर्चाही खरंच शोध-बोध करणारी होती. 'सध्या काम करत नाही अशा ससेवाडी, गोगलवाडीतूनही गाडीभर महिला आल्या होत्या.' 'मुलींचे खेळ चांगले झाले. त्यांचे ड्रेस विकतचे नव्हते. बजेट मध्ये होतं सारं ...मुली बिनधास्त नाचत होत्या, मजा आली', आता आपण सहज १०,००० महिलांचा मेळावा घेऊ शकू असं वाटतंय', 'गावातल्या लोकांच्या पण प्रतिक्रिया चांगल्या होत्या'. कार्यक्रमाची जेवण व्यवस्था चांगली झाली, लग्नात जेवण वाया जातं तसं मेळाव्यात वाया काही गेलं नाही', 'गाड्या ठेवल्यामुळे संख्या चांगली जमली. गाड्या भरून आल्या त्यानं बर वाटलं. गाडी वाल्यांनी पैसे घेताना पण काही ताण दिला नाही, मेळावा बघितल्यावर म्हणाले ...तुम्हाला काय द्यायचे ते द्या', गाडीवर मेळाव्याचा फ़्लेक्स लावला त्यामुळे टोल पडला नाही.'कार्यक्रमच आपला होता त्यामुळे कोणाचं दडपण नव्हतं म्हणून स्टेजवर पण वावरलो',मेळाव्याला या म्हटलं तर सगळ्या आल्याच.... मेळाव्यात पुरुष शोधायला लागतं होते, १०० सुद्धा नव्हते.' 'गणवेशाने मान मिळाला, गणवेश घातला पण तिच्याकडे काही जबाबदारी नाही असं होतं, तिलाच काहीतरी चुकलं असं वाटत होतं' 'नावं नोंदणी करणारा गट पार गडबडला... तिथं जिचं ऐकेल अशी महिला हवी होती, कोणाला नावं लिहिण्यापुरतं सुद्धा थांबायला वेळ नव्हता', 'काही जणी तर मेळाव्याच्या दिवशी पिशवीत तांदूळ घेऊन आल्या होत्या!' 'गावागावातून १५-२० जणींना फोन आले. स्थानिक लोकांनी दाखल घेतली,ड्रायव्हरसुद्धा थक्क झाले. पैसे न देता एवढ्या महिला कशा आल्या? विचारत होते मला'. 'फि ल्ममुळे आपलं काम कळलं, मोठी स्क्रिन होती तर बायकांनी सिनेमाच पाहिला असं गावात सांगितलं....परिणाम चांगला झाला' 'कार्यालय छोटं पडलं', 'पाहुण्यांच्या जेवणाचं जरा नीट पाहायला हवं होतं.' 'जेवणाची थोडी तारांबळ झाली, पण बाकी कार्यक्रम शांततेत पार पडला.' 'पाण्याची सोय बाहेर कुठेतरी करायला हवी होती', 'राजकारणातला कुठलाच पुढारी नाही, असा हा पहिलाच कार्यक्रम सगळ्यांनी पाहिला' ..... अजून काय काय सांगत होत्या...... काम करून जेवढं दमायला झालं नव्हतं तेवढ ...'आम्ही केलं!' या कर्तेपणानं 'यशस्वी झाल्यावर' दमायला झालं होतं. बैठकीतल्या चर्चेने साऱ्या स्वस्थ झाल्या, तरी 'पूर्ण हॉल भरून बसलेल्या महिला .... अजून डोळ्यासमोर दिसताहेत' ....असं म्हणत एका 'लाईफ टाईम अचिव्हमेंटची' ची सांगता झाली!

*****

## आमचेही तंबू शिबिर........

**आशा सुर्वे**

किशोरींचे तंबू शिबिर दरवर्षी आयोजित केले जाते. या शिबिरातील मजा काही वेगळीच असते. आम्ही बचतगटाच्या कार्यकर्त्यांनी कधी असे तंबूतले शिबिर अनुभवले नव्हते. म्हणून खोपी गावातील किशोरींचे तंबूतले शिबिर संपल्यावर सगळ्या गावातील महिला प्रतिनिधींचे राहते तंबू शिबिर घ्यायचे असे आम्ही ठरवले.

**नियोजनातली गंमतः** मुलींचे शिबिर संपले म्हणजे त्यातच शेवटच्या दिवशी महिलांचे शिबिर घेऊयात म्हणजे वेगळी तंबूची व्यवस्था करायला नको, असे म्हणून सर्व गावातील कार्यकर्त्यांना निरोप दिले. प्रत्येक गावातील २जणी याव्यात अशी कल्पना होती. साधारण ३० जणी झाल्यातरी आम्ही शिबिर घेणार होतो. पण प्रत्यक्षात फक्त ११च महिला तयार झाल्या. त्याही संस्थेच्या कार्यकर्त्याच होत्या. शिवापूर, आंबवणे, वेल्हे आणि मावळ भागातून महिला येणे अपेक्षित होते. मोठ्या गावात आपण काय तंबूत जाऊन राहायचे असे म्हणून कोणीच महिला न आल्यामुळे शेवटी तंबू शिबिर रद्द केले. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सर्व कार्यकर्त्यांची मासिक नियोजन बैठक ( सुकाणू बैठक ) होती त्यात तंबू शिबिराची चर्चा झाली व १४-१५ फेब्रुवारीला शिबिर घेवू व खोपी ऐवजी डोंगरातील वागदर हे ठिकाण आम्ही निवडले. सर्व मासिक बैठकींमधून तंबू शिबिराची माहिती दिली आणि ३० जणी येण्याची खात्री केली.

**१४ तारखेची सकाळः** वागदर गावात सकाळपासून महिला येऊ लागल्या. अपेक्षेपेक्षा जास्ती महिला शिबिरासाठी आल्या होत्या. ३२ गावांमधून ६५ महिला दाखल झाल्या! सर्वजणींचे मिळून आठ गट केले. प्रत्येक गटात अनेक गावांच्या महिला होत्या. नावनोंदणी झाल्यावर सर्वांनी पहिल्यांदा जेवण केले. वाघदरच्या स्वयंपाकवाल्या बायका खंबीर होत्या म्हणून संख्या दुप्पट होऊनही साऱ्यांची जेवणं झाली.

**तंबू ठोकण्याची खटपटः–** शेवटी आलेल्या गटाचे जेवण चालू होते तोपर्यंत पहिल्या गटातील महिला तंबू ठोकण्यासाठी माळावर आल्या. सगळे सामान एकीकडे करून महिलानी स्वतःच तंबू ठोकले. वारीमुळे काहीजणींना तंबू ठोकण्याचा सराव होता. त्यांनी भराभरा पुढे होऊन ५ तंबू ठोकले.
गटातील सर्वांनीच त्यांना मदत केली.

**रूप पालटू शिवप्रदेशाचेः–** पहिले सत्र सुरू झाले. यात प्रत्येक गटाला नाट्यसादरीकरण करायचे होते. सुवर्णाताईंनी सांगितल्याप्रमाणे सर्वांनी "२०२५ सालातील आपल्या कामाचे स्वरूप काय असेल" यावर नाटक सादर करायचे होते. असे करताना सोयीचे जावे म्हणून प्रत्येकाला विषय वाटून दिले होते. आरोग्य, पाणी, आपला गाव, गावातील कामाच्या गरजा, भविष्याचे नियोजन सर्व गोष्टी डोळ्यासमोर ठेवून आपण आपल्या गटात मुद्दे घेऊन चर्चा करायची आणि खालील गोष्टींवर नाटक सादर करायचे होते. सर्वांनी त्या विषयात २०२५ साली काय स्थिती असेल ते दाखवायचे होते. विषय होते
१. शिक्षण २. आरोग्य ३. जिजामाता प्रबोधन केंद्र ४. ज्ञान प्रबोधिनीची कार्यकर्ती.

**संसर्ग**

भारतीला भेटायला तिची बहीण आली तर तिला समजले भारती तंबू शिबिरात गेली आहे. तिला खूप उत्सुकता वाटली म्हणून ती भेटायला तंबू शिबिरात आली. तिथले वातावरण तिला इतके आवडले की तिने शिबिरात मुक्कामच केला. 'हे असं शिबिर कसं घडलं.' याचा तिने विचार केला नि समजलं गावात बचतगट सुरू होणं ही याची सुरवात होती! दुसऱ्या दिवशी घरी गेली ती हा विचार मनात घोळवतंच नि महिन्यात तिने कासुर्डी गावात गट सुरू केला. मार्च अखेरपर्यंत कासुर्डीत सुरू झालेल्या या प्रबोधिनीच्या गटाचं खातं बँकेत निघालं सुद्धा !

प्रत्यक्ष सादरीकरणाच्या वेळेला खूपच मजा आली. खूप महत्त्वाचे मुद्दे त्या निमित्ताने सर्वांसमोर आले. त्यातले काही मुद्दे सर्वांसमोर ठेवत आहे.
शिक्षण– मुलांना इंग्रजी माध्यमाचीच शाळा लागेल. सादरीकरणातल्या आजीनेही इंग्रजीत उत्तर दिले.
आरोग्य–आरोग्याच्या सर्व सुविधा ह्या प्राथमिक आरोग्य केंद्रात असतील. अद्ययावत यंत्रसामुग्री असलेले कार्यालय व प्रशिक्षित डॉक्टर असतील आणि चांगली दळणवळण व्यवस्था आणि रस्ते असल्याने ते रोज चक्क हजर असतील.
जिजामाता प्रबोधन केंद्रः–जीवनावश्यक वस्तू एकाच ठिकाणी मिळणारा मॉल असेल. किशोरी, युवती, महिला यांच्यात शिक्षण, आरोग्य, उद्योजकता अशा सर्व क्षेत्रात काम करण्यासाठी केंद्राची ५ मजली इमारत असेल असे नाटकात दिसले. बालविकासापासून स्पर्धापरीक्षेच्या प्रशिक्षणापर्यंतची सर्व शिक्षणाची व्यवस्था येथे असेल आणि बचतगटात जाणाऱ्या महिलांची मुले यात सहभागी होतील.
जिजामाता प्रबोधन केंद्राची कार्यकर्तीः– ती लॅपटॉप हाताळणारी असेल. तिची स्वतःची दुचाकी असेल.

सादरीकरणात प्रत्येकजण सहभागी झाली होती. प्रत्येकीलाच आपल्या कामाविषयी आणि संस्थेविषयी आस्था आहे, असे दिसत होते.

**संघटना हे सूत्र बनावेः–**सादरीकरण झाल्यावर ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांचे मार्गदर्शन झाले. चांगले संघटन करण्यासाठी आम्ही काय केले पाहिजे हे त्यांनी आम्हाला सांगितलेः–

* तुम्ही सगळ्या एकाच संघटनेच्या सदस्या आहात.
* इतरांसाठी काम करा. आपल्या कल्पना इतरांना सांगा.
* इतरांची मदत घ्या.
* काम व्यवस्थित होण्यावर भर द्या.
* एकमेकींना अधिक समजून घ्या.
* गटात चांगले वाईट याची चर्चा करा.
* स्वतःबरोबर इतरांना मोठे करणे म्हणजे संघटन.
* सर्वांनी मिळून जिजामाता प्रबोधन केंद्राची शक्ती लावून काम सुरू केले तर संघटनेचा वेगळा परिणाम दिसेल.
* महिला दक्षता समिती या सरकारने तयार केल्या पण आपल्या कार्यकर्त्यांच आता ते काम करीत आहेत.
* महिला स्वयंपूर्ण झाल्या म्हणून स्वयंस्फूर्तीने जिजामाता प्रबोधन केंद्र तयार झाले आहे.

रात्री बागेश्रीताईंचे दारूबंदीवरील अनुभवकथन झाले. स्थानिक व्यक्तींबरोबर त्यांनी कसे काम केले ते त्यांनी सांगितले.

**१५ तारीख :** धरणा जवळ शिबिर असल्याने सगळ्यांचे भराभरा आवरले. उपासनेने दिवसाची सुरुवात झाली. यानंतर सुवर्णाताईंचे सत्र झाले. आपल्या कामाला २० वर्षे पूर्ण झाली आहेत. द्विदशकपूर्ती म्हणजे २० वर्षे झाल्याबद्दल आपण कोणता कार्यक्रम करावा, असे त्यांनी विचारले. सर्वानुमते मोठा मेळावा घ्यावा असे ठरले. सर्वांनाच काम करावे लागेल. काय काय काम करावे लागेल यावर चर्चा झाली व मेळाव्याची तारीख ठरली १८ एप्रिल २०१५.

भट्टी गावातील सुमनताई कोकाटे यांनी सांगितले की त्यांच्या गावातील त्यांच्या नातेवाईकांचे सातारा रस्त्यावर कार्यालय

आहे. मेळाव्यासाठी ते कार्यालय मिळविण्याची जबाबदारी त्यांनी घेतली. इतरांनीही त्यांच्या जबाबदाऱ्यांविषयी सांगितले.

**माझ्या गावात मीच प्रबोधिनीः–**सर्वात शेवटचे सत्र मा. रामभाऊ डिंबळे यांचे झाले. त्यांनी सर्व महिलांना सांगितले की कोणाची वाट पाहात आपल्याला थांबायचे नाहीये. आपल्या गावात आपणच ज्ञान प्रबोधिनी आहोत. ज्ञान प्रबोधिनी म्हणजे जागे करणारी संस्था. सर्वांना शिक्षणाने जागे करायचे आहे. गावातील पुढारी काय सांगतो ते आता महिलांनी करायचे नाहीये.त्यांनी जागे व्हायचेय आणि स्वतःच्या मनाप्रमाणे गाव घडवायचे आहे.

**परिणामः–** सर्व तंबू शिबिरच 'संघटन' या विषयावर होते. याचा परिणाम म्हणून सर्व महिलांनी कंबर कसून कामाला सुरवात केली. एप्रिल महिन्यात जो भव्य महिला मेळावा झाला त्यांची निम्मी तयारी या तंबू शिबिरात झाली. त्यामुळेच आम्ही भव्य महिला मेळावा पार पाडू शकलो. ६५ महिलांच्या मदतीने ९२ गावांमधील ... ४०००महिलांपर्यंत आम्ही त्यामुळेच पोहोचू शकलो.चाकोरीतून बाहेर पडताना...या नावाच्या फिल्ममध्ये म्हटल्याप्रमाणे आम्ही चाकोरीतून बाहेर पडलो म्हणूनच हे साध्य करू शकलो. आमचे सगळ्यांचे डोळे तृप्त झाले. ठरवलेले ध्येय पूर्ण केल्याचे समाधान मिळाले. कार्यालय ओसंडून महिलांची संख्या आली होती. हे सर्व घडू शकले कारण तंबू शिबिराचा मजबूत पाया त्याला मिळाला हेही तितकेच खरे आहे.

*****



---

***या सर्वांप्रती आम्ही ऋणी आहोत...***

नियमित कार्यकर्त्यांबरोबरच प्रबोधिनीतील आणि प्रबोधिनी बाहेरील अनेकांनी स्वयंसेवी वृत्तीने या विभागाच्या कामात केलेले अनेकविध प्रकारचे योगदान हे यावर्षीचे अत्यंत महत्त्वाचे असे वैशिष्ट्य आहे. कुणी आपला वेळ दिला, कुणी कल्पना दिल्या, कुणी वस्तूरूप देणगी दिली तर कोणी भागात जाऊन शिबिरे घेतली. ये़थे चाललेले काम अधिक सघन आणि योग्य दिशेने जाण्यासाठी मदत झाली. सर्वांच्या सहकार्यामुळे हे काम शक्य़ झाले.

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**

प्रेषक :

**ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)**

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

दूरभाष क्र. २४२०७१६२, २४२०७०००

e mail : ssprabodhan@jnanaprabodhini.org